कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे


# संपर्क




● पुणे ● वर्ष १७ वे ● अंक १ ला ● जानेवारी-मार्च २०२१ ● किंमत रु. २०/- ● पृष्ठसंख्या ४० ● वार्षिक वर्गणी रु. १००/-

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!




www.2factor.in
Promote Your Business
Acquire New Customers
Deepen Customer Relationship
BULK SMS
marketing
12%
of facebook posts are read
29%
of tweets are read
31%
of emails are opened
98%
of text messages are read
CHECKED
150
TIMES A DAY
The average person looks at their phone 150 times a day
MOBILES ADS
75%
of people prefer receiving marketing messages via SMS
15%
prefer receiving email ads
10%
prefer in-app or push ads
Solv Technologies
2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park
Lower Parel, Mumbai 400013
www.2factor.in
sales@2factor.in
022-48933933

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!



| वर्ष १७ वे | जानेवारी-मार्च २०२१ | अंक १ ला |
|---|---|---|

अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर
मोबा. ९८१९८८५६६५

सचिव : श्री. गणेश गुर्जर
मोबा. ९८९०९९०११३

कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र करंबेळकर
मोबा. ९८२०२४२५३०

संस्था नोंदणी क्र. : महा-१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र. : एफ ४६५२३ पी. दि. ३/३/२०१६

### ✻ संपादक मंडळ ✻

संपादक : श्री. हेमंत पुराणिक, ९९२३८१०१९४
तंत्रज्ञ : श्री. सचिन ताटके, ९८६७१९२३१०
सल्लागार : श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली-सदस्य, ९८३३१६३६५९
सदस्य : सौ. मेघा नाटेकर, ९६३७१५५९४८
श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, ९४०३७०२७३४
श्री. अविनाश मणेरीकर, ९४२२३७९८७८
प्रकाशक : श्री. गणेश गुर्जर, ८१४९९०७७८९

### जाहिरातीचे दर

| पान | एक वेळ | चार वेळा |
|---|---|---|
| पाव | रु. ५००/- | रु. २,०००/- |
| अर्धा | रु. १,०००/- | रु. ४,०००/- |
| पूर्ण | रु. २,०००/- | रु. ८,०००/- |
| शुभेच्छा | रु. ५००/- | रु. २,०००/- |
| पूर्ण पान रंगीत | रु. ३,०००/- | रु. १२,०००/- |
| पृष्ठदान | रु. २००/- | — |

- नियतकालिकाचे नांव : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे **'संपर्क'**
- पत्ता : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ, द्वारा : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंटस्, भटांचा बोळ, पुणे ४११ ०३०
- संपादक : श्री. हेमंत पुराणिक
- मुद्रक : प्रिन्ट व्ह्यू, बुधवार पेठ, फलटण ४१५ ५२३, जि. सातारा

ऑफिस संपर्क : ०२०-२४४३२४४३, मोबा. ८१४९९०७७८९
Email : bkmsindia@gmail.com

### ✻ शहर प्रतिनिधी ✻

- श्री. प्रसाद पंडित, मुंबई, ९८६९१५५२१५
- श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
- श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली, ९८३३१६३६५९
- श्री. मनीष नवाथे, नागपूर, ९८५०३३१४६०
- सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९७३६७९
- श्री. भालचंद्र करंबेळकर, सातारा, ९०११०६३०३०
- श्री. दिलीप ढवळे, रत्नागिरी, ९४२२५४९०८५
- श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
- श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
- श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
- श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, पुणे ९४०३७०२७३४
- श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
- श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७९९६९७
- श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८८०१३८
- श्री. अजित सरवटे, ठाणे, ९९८७२०५६९०
- सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५

### आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की, आपली वार्षिक वर्गणी आता रु. ३००/-, रु. ५००/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षांसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वतः रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी. (पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे ३० च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे.) शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक 055210110004008 असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयातच पाठवावा. कृपया मनिऑर्डर पाठवू नये.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री. गणेश गुर्जर यांनी मुद्रक प्रिन्ट व्ह्यू, २९९, कसबा पेठ, फलटण येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!

आयुष्य हे विधात्याच्या...
वहीतील पान असतं...!
रिकामं तर रिकामं,
लिहिलं तर छान असतं...!
शेवटचं पान मृत्यू अन्
पहिलं पान जन्म असतं...!
मधली पाने आपणच भरायची,
कारण ते आपलंच कर्म असतं...!
होणाऱ्या चुकांना टाळायचं असतं,
कुठलंच पान कधी गाळायचं नसतं...!
चूक झाली तरी फाडून फेकायचं नसतं,
कारण त्यातूनच आपल्याला
पुढे शिकायचं असतं...!
नाती जपण्यात मजा आहे
बंध आयुष्याचे विणण्यात मजा आहे
जुळलेले सूर गाण्यात मजा आहे
येताना एकटे असलो तरी
सर्वांचे होऊन जाण्यात मजा आहे
नशीब कोणी दुसरं लिहित नसतं
आपलं नशीब आपल्याच हाती असतं
येताना काही आणायचं नसतं
जाताना काही न्यायचं नसतं
मग हे आयुष्य तरी
कोणासाठी जगायचं असतं
याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी
जन्माला यायचं असतं
आहात तुम्ही 'सावरायला'
म्हणून 'पडायला' आवडते,
आहात तुम्ही 'हसवायला'
म्हणून 'रडायला' आवडते
आहात तुम्ही 'समजवायला'
म्हणून 'चुकायला' आवडते
माझ्या आयुष्यात आहेत
तुमच्यासारखे सगळे म्हणून
मला जगायला आवडतं...

कवि - मंगेश पाडगांवकर

## अंतरंग


| लेख | लेखक | पान नं. |
|---|---|---|
| संपर्क आपल्या हाती | बाळासाहेब भाटे | ...... ४ |
| दुर्लक्षित आचार्य | प्रतिभा प्रभुदेसाई | ...... ७ |
| माझी फोटोग्राफी | अशोक गोवारीकर | ...... १० |
| ऑनलाईन कार्यक्रम | श्रीपाद सप्रे | ...... १४ |
| 'तोचि खरा साधू... तोचि खरा संत..' | विजय आंबर्डेकर | ...... १५ |
| संस्थावृत्त कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा | — | ...... १७ |
| झाले मोकळे आकाश | श्रीम. सुषमा चिंचाळकर | ...... १८ |
| आयुष्यमान व्हा ! | महाराष्ट्र टाईम्स बातमी | ...... २० |
| नाते अर्धांगीनीचे | Whatsapp च्या माध्यमातून | ...... २१ |
| कमाल शंभरी | अमित शहाणे | ...... २२ |
| बाईचा न दिसणारा संसार 'कॅलेंडर' | सौ. लीना मुळ्ये | ...... २३ |
| निष्प्राण देह पडला... | श्रीरंग श्री. हिर्लेकर | ...... २४ |
| गणपतीची ३२ रूपे | संग्राहक-सुहास खानवलकर | ...... २६ |
| काळ बदलला (कविता) | अनामिक | ...... २८ |
| रत्नागिरीतील अठरा हातांचा गणपती | सौ. विजया फणसळकर | ...... २९ |
| खसखस | सौ. शुभदा गुर्जर | ...... ३० |
| हा बदल नक्की केव्हा झाला ? | संदीप कळके | ...... ३१ |
| बिनधास्त जगा मित्रांनो.. | गणेश गुर्जर | ...... ३२ |
| Surname in Maharashtra.. | अरुण सरपोतदार | ...... ३३ |
| राणी लक्ष्मीबाई जयंती | संस्थावृत्त | ...... ३४ |
| तव स्मरण आम्हां घडो... | — | ...... ३५ |

# संपादकीय



सस्नेह नमस्कार,

माहे जानेवारी २१ ते मार्च २१ चा हा 'संपर्क'चा अंक आपल्या हाती देताना आम्हांला खूपच आनंद होत आहे. कोरोनासारख्या महामारीचा अजूनही मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होत आहे आणि जगभरातील सर्व व्यवहार ठप्प झाले. थोडी उसंत मिळाली ती सरकारी नियमानुसार अन्लॉक पद्धतीमुळे आणि ऑक्टो.-डिसेंबर २०२० चा अंक प्रकाशित झाला, पण ज्या प्रमाणात कोरोनाची परिस्थिती सुधारावी अशी अपेक्षा होती त्या प्रमाणात ती झाली नाही. थोडीफार झाली पण... जाने.-फेब्रु. २१ मध्ये पुनश्चः यात वाढ होत आहे. अजूनही हे सावट सुरुच आहे. यामुळे सर्व संघांचे अन्य संस्थांचे सार्वजनिक कार्यक्रम बंद होते. सभासदांशी प्रत्यक्ष संपर्क होत नाही अशा परिस्थितीमध्ये संपर्कची सभासद संख्या कमी होत राहिली. प्रत्येक संस्थांचे जेव्हा जेव्हा कार्यक्रम होत असतात त्यावेळी संपर्कचे सभासद पुढील वर्गणी जमा करून आपले नूतनीकरण करतात, पण वर्ष २०२० हे अत्यंत दुःखदायक ठरले म्हणून आपले काम विस्कळीत झाले.

असो.. आपले काम हळूहळू पूर्वपदावर येण्यास काही अंशी सुरुवात झाली आहे. शहर प्रतिनिधी विविध मार्गाने आपल्या सभासदांशी संपर्क करून त्यांना सभासदत्वाचे नूतनीकरणे करण्यास सुचवित आहेत आणि हळुहळू आता त्याचा परिणाम दिसत आहे. सभासद आपले नूतनीकरण करण्यास उत्सुक आहेत. सभासदांनी फक्त वर्गणी जमा करून आपले दायित्व पूर्ण होते असे नाही तर त्यांच्याद्वारे त्यांचे काही अप्रकाशित लेखन असेल, काव्य प्रकार असेल, प्रवास वर्णने असतील.. थोडक्यात काव्य-शास्त्र-विनोद या सर्व माध्यमातून त्यांनी आपले साहित्य पाठविले तर ते 'संपर्क'मध्ये यथायोग्य प्रकाशित करता येईल.

ज्या सभासदांनी आपले नूतनीकरण केले त्यांना धन्यवाद आणि विनंती की, आपल्या जवळपास असलेल्या ज्ञातीबांधवांना संपर्कचे सभासदत्व घेण्यास विनंती करावी. तसेच ज्यांचे व्यवसाय उद्योग आहेत त्यांनी जाहिराती देऊन उपकृत करावे अशी विनंती. जरी करोनाचा प्रादुर्भाव कमी-जास्त होत असला तरीसुद्धा आपण आपले ब्रीदवाक्य कायम ध्यानात ठेवून त्यानुसार 'संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या.'

**- संपादक मंडळ**

# 'संपर्क' आपल्या हाती

**श्री. बाळासाहेब भाटे,** सातारा, मो. ९४२२४०२६४९

'संपर्क आपल्या हाती' असे लेखाचे शीर्षक ठेवण्याचे प्रयोजन थोडे हटके आहे. या संदर्भातील विवेचन पुढे विस्ताराने केले आहे. साहित्यिक दर्जाचे हे अक्षरशिल्प नसून आम्ही हाती घेतलेल्या स्तुत्य उपक्रमाच्या वाटचालीतील सुखद अनुभवांची शिदोरी आपणासाठी उलगडली आहे. मनातील भावभावनांचा, आनंद द्विगुणीत करणारा हा मंगल कलश आहे. आपल्या संपर्कच्या वाचकांना या आनंदमय सोहळ्यात सहभागी करून घ्यावे या विचारधारेतून बोली भाषेतील हा एक छोटासा प्रयत्न आहे इतकचं !

कोरोनाच्या महाभयंकर संकटाने जवळजवळ एक वर्षभर माणसामाणसातला संपर्क तुटला, संवाद संपला, रक्ताची नाती पातळ झाली. लॉकडाऊनमुळे संपर्क या त्रैमासिकाचा संपर्कपण तुटला, त्यामुळे **संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!** हे आपले ब्रीदवाक्य विस्मृतीत जाते की काय अशी शंका घेण्याइतपत परिस्थिती निर्माण झाली होती. तथापि, 'सब्र का फल मिठा होता है ।' याची प्रचिती नुकतीच आली. कोरोनाचा प्रार्दुभाव कमी होत गेला. अनेक निर्बंध हळूहळू शिथील झाले. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच संपर्कचा रंगीत, अतिशय सुंदर, माहितीपूर्ण अंक साताऱ्यात मोजक्याच लोकांच्या हाती पडला. अनेक दिवस प्रतिक्षा करून देखिल बहुतांश सभासदांना पोस्टाद्वारे किंवा कुरिअरने अंक मिळाला नाही. आम्ही जे मेंबर्स होते त्यांना फोन करून अंक मिळाला का? अशी विचारणा केली. सर्वांचे उत्तर एकच.. अंक मिळाला नाही.

महासंघाचे सचिव तसेच 'संपर्क' मासिकाचे प्रकाशक आदरणीय श्री. गणेश गुर्जर यांचेशी याबाबत मी संपर्क साधला. संपर्कचे प्रिटींग आणि वितरण ही व्यवस्था फलटणमधील एकाकडे दिल्याचे त्यांनी सांगितले. तुम्हाला पोस्टाद्वारे लवकरच अंक मिळतील असा आशावाद त्यांनी आमचे मनी जागवला. तथापि, अनेक दिवस प्रतिक्षा करून देखिल अंक हाती न मिळाल्याने मी परत त्यांना फोन केला. आम्ही त्यांना सातारा पोस्ट ऑफिसमध्ये अंकाचे संदर्भात जावून आल्याचे पण सांगितले. शेवटी यातून सुवर्णमध्य काढून कुरिअरमार्फत अंक पाठवून आमचा प्रश्न मार्गी लावला आणि कळत-नकळत आमची जबाबदारी वाढविली.

मी अनेकवेळा अंकाच्या विलंबासंदर्भात श्री. गणेश गुर्जर यांना वेळी-अवेळी फोन केले. पण कधीसुद्धा ते वरच्या आवाजात माझ्याशी बोलले नाहीत. वडीलकीच्या नात्याने त्यांनी नेहमीच मला मौलिक मार्गदर्शन केले. संपर्कचे मेंबर वाढविण्याचा आम्ही त्यांना शब्द दिला होता, त्यामुळे आमची या संदर्भातील प्रगती, अनुभव मी वेळोवेळी त्यांना फोनवरून सांगत असे आणि त्यांचे कौतुकांचे शब्द आमच्या वाट्याला येत असत. एखाद्याचे कौतुक करायला माणसाजवळ मनाचा मोठेपणा असावा लागतो. आपल्या सहकाऱ्याचे कामाचे कौतुक करणे हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायी भाव आहे. याबाबत काही माणसे नको इतकी काटकसरी असतात. तथापी गुर्जर साहेबांचे व्यक्तिमत्त्व मात्र याला अपवाद आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील या लोभसवाण्या पैलूचे दर्शन यापूर्वी अनेक वेळा मला महासंघाच्या कार्यक्रमातून घडले आहे. आम्ही त्यांना सातारला कार्यक्रमासाठी आवर्जून निमंत्रण देत असतो. कारण येताना ते चैतन्य घेवून येतात आणि जाताना नवीन उर्जा देवून जातात. कार्यक्रमाला त्यांच्या उपस्थितीमुळे एक वेगळी उंची प्राप्त होते. या निमित्ताने त्यांच्या सहकार्याचा ऋणनिर्देश या ठिकाणी आवर्जुन करणे मला अगत्याचे वाटते.

मी व सुधीरने संपर्कचा प्रसार आणि प्रचार ही मोहीम हाती घेतली. मोहिमेची सुरुवात पदयात्रेने झाली.

आम्ही रोज ४.३० ते ७ ही वेळ निश्चित केली. लांब वास्तव्यास असणाऱ्या सभासदांसाठी वाहनाच्या सहाय्याने ध्येयपूर्तीच्या दृष्टीने आमची वाटचाल सुरु होती. सोबत संपर्कचे अंक असायचेच. संघाच्या यापूर्वीच्या कार्यक्रमातून सभासदांच्या गोठीभेटी होतच होत्या. तथापि, यानिमित्ताने प्रत्यक्ष घरी जाण्याचा योग आला. कऱ्हाडे ब्राह्मण संघामुळे विणली गेलेली भावनिक नात्यांची वीण या उपक्रमामुळे अधिक दृढ झाली. आमचे सर्वच ठिकाणी अतिशय अगत्यपूर्वक, आनंदाने आणि अगदी मनापासून स्वागत झाले. आम्ही भारावून गेलो. त्या सर्वांच्या प्रती आम्ही मनःपूर्वक कृतज्ञतेची भावना व्यक्त करतो आणि आपणा सर्वांच्या प्रेमाचा आदर करतो. आमच्यामुळे काही सभासदांची झोपमोड झाली. याची आम्हाला जाणीव आहे. त्यांची क्षमा मागतो. अनेकांकडून मौलिक सूचना मिळाल्या. ज्येष्ठाचे मार्गदर्शन, आशीर्वाद लाभले. नवीन उपक्रम सुचविले गेले. संघाच्या वाढीच्या दृष्टीने ही मोठी जमेची बाजू आहे असे मला वाटते. हा उपक्रम म्हणजे आमच्या 'मर्म बंधातील ठेव' झाली. आज वेदना, संवेदना, सहानुभुती या भावशक्ती लोप पावत चालल्या आहेत. या पार्श्वभूमीवर समाजामध्ये चांगल्या विचारांचे, आचारांचे नितीमूल्यांचे अभिसरण सातत्याने होणे गरजेचे आहे. म्हणून या मंगल कलशातील काही सुखद आठवणी वानगी दाखल आपल्यासाठी...

मी व सुधीर असेच एका सभासदांचे घरी गेलो. त्यांना पण अंक मिळाला नव्हता. आम्ही अंक देवून तीन वर्षाची वर्गणी रुपये ३००/- सांगितली. त्यांनी सत्वर पैसे दिले. सरबताचा आस्वाद घेत असताना विविध विषयांवरील गप्पा रंगल्या. बोलता बोलता सुधीर म्हणाला, 'अमुक एका सभासदाला अंक मिळाला आहे आणि त्यांनी आवर्जून वर्गणी घेवून जा असे सांगितले आहे. आम्ही त्यांच्याकडे पण जाणार आहोत' हे वाक्य पूर्ण होण्याचे आतच त्यांनी आणखी रु. ३००/- आमचे हाती ठेवले. आम्ही अचंबित झालो. ते म्हणाले, 'आम्ही दोघे चांगले मित्र आहोत. आमची गळाभेट नेहमी होत असते. तुम्ही इतक्या लांब जाण्याची आवश्यकता नाही. मी त्यांचेकडून पैसे घेईन. तुम्ही प्रत्येकाचे घरी जावून इतकी आस्थेवाईकपणे चौकशी करता याचे फार कौतुक वाटते. मला अशाप्रकारे घरबसल्या तरी तुमची मदत करण्याचा आनंद घेवू द्या.'

एके ठिकाणी दारावरची बेल वाजविली. बऱ्याच वेळेच्या प्रतिक्षेनंतर दार उघडले गेले. आम्ही गृहप्रवेश केला. येण्याचे प्रयोजन विषद केले. ते म्हणाले, घरात आम्ही दोघे असतो. मुले नोकरीनिमित्त बाहेरगांवी आपापल्या प्रपंचात. वयोमानानुसार दोघांचेपण दिसण्याचे प्रमाण कमी झाले आहे. पेपरसुद्धा वाचला जात नाही पण मी तुम्हाला नाराज करणार नाही. तुम्ही दोघे प्रत्येकाचे घरी जावून ही नाती जपतायं याचे अप्रुप वाटते. आपल्या संघाच्या कार्याला माझा हातभार लागतो आहे याचा आनंदच आहे. त्यांनी तीन वर्षाची वर्गणी दिली. चहाचा आस्वाद आणि त्यांचा आशीर्वाद घेवून आम्ही मार्गस्थ झालो.

सुधीर आणि मी काही वेळा सोयीनुसार स्वतंत्रपणे सभासदांच्या घरी जात असू. एकदा मी एका सभासदांच्या घरी अंक घेवून गेलो. अंक त्यांच्या हातात देवून तीन वर्षाची वर्गणी रु. ३००/- जमा करीत असल्याचे सांगत असतांनाच स्वयंपाकघरातून सौ. वहिनींचा आवाज आला. 'मामांना लगेचच वर्गणी द्या, त्यांना परत हेलपाटा देवू नका.' सार्वजनिक काम म्हणजे लष्कराच्या भाकरी भाजण्याचा प्रकार अशी एक म्हण आपल्यात रुढ आहे. पण मनस्वी सांगतो, मला त्यावेळी त्या माऊलीच्या 'मामांना परत हेलपाटा देवू नका' या वाक्यामुळे त्या भाकरीतील गोडवा अनुभवायला मिळाला. आपलेपणा, काळजी, प्रेम, वयाचा मान अशा सर्व भावभावनांचा स्पर्श माझ्या अंतर्मनाला त्याक्षणी स्पर्शून गेला. मी भावविवश झालो. जिन्याच्या पायऱ्या उतरत असतानाच डोळ्यातील आनंदाश्रुनी वाट मोकळी केली.

उगवत्या सूर्याला सर्वजण नमस्कार करतात, पण मावळतीकडे सुद्धा तितक्याच कृतज्ञतेने पहाण्याचा

व्यापक दृष्टीकोन या उपक्रमात आम्ही आवर्जून जपला. सातारा कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या पायाभरणीत ज्यांनी मोलाचे योगदान दिले. बहुमोल वेळ दिला. आर्थिक झळ सोसली त्या सर्वांच्या घरी आवर्जून गेलो. जुन्या गोड स्मृतींना उजाळा दिला. त्यांच्या तब्बेतीची आस्थेने चौकशी केली. मनमुराद हसलो. त्या ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, वयोवृद्ध, प्रज्ञावंतांचे आशीर्वाद संघाच्या भावी वाटचालीसाठी तसेच आमच्या व्यक्तिगत जीवनासाठी आम्हांला लाभले याहून भाग्य वेगळे ते काय असते.

संपर्क मासिकाचे मेंबर वाढविणे तसेच ज्ञाती बांधवांशी यानिमित्ताने सुसंवाद साधणे हे शिवधनुष्य सुधीर करंबेळकर यांनी लिलया पेलले. आपल्या वडीलांची परंपरा त्यांनी समृद्ध केली. या यशाचा शिल्पकार सुधीर आहे. माझा या उपक्रमामध्ये फक्त खारीचा वाटा होता. माझ्या वाट्याला आलेला आनंदाचा हा ठेवा, आठवणींची साठवण, मी फक्त शुद्ध रुपाने आपल्यापर्यंत पोहोचविण्याचा केलेला हा अल्पसा प्रयत्न आपण गोड मानून घ्यावा.

महासंघ आणि त्याला संलग्न असलेले अन्य ठिकाणचे संघ यांच्या कार्याचे सिंहावलोकन करताना आम्हाला प्रत्येक मिटींगमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की आपल्याला अजून खूपच लांबचा पल्ला गाठायचा आहे. सर्व संघाच्या कार्याची व्याप्ती मोठी आहे. प्रत्येक संघाने आपल्या कार्यक्षेत्राच्या कक्षा रुंदावल्या आहेत. या दृष्टीने आम्ही आत्मचिंतन करीत गेलो. यातूनच ही मोहिम हाती घेतली. खरं तर अन्य संघाच्या तुलनेने आमची कामगिरी कुणी कौतुक करावी एवढी निश्चितच मोठी नाही याची जाणीव, भान आम्हाला आहे. तथापि, संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टीने आम्ही केलेले प्रयत्न मात्र आम्हांला आनंद देवून गेले. या आनंद यात्रेत आपल्याला सहभागी करता यावे म्हणून सुरु केलेला माझा हा लेखन प्रवास मी येथेच थांबवितो. धन्यवाद !

**।। आनंदाचे डोही आनंद तरंग ।।**
**।। आनंदचि अंग आनंदाचे ।।**

**



## आपणां सगळयांच्या माहितीसाठी

ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या अडचणीच्या काळात नेहमीच संपूर्ण ताकदीनिशी उभे राहणारे पितांबरी उद्योगसमूहाचे सर्वेसर्वा श्री. रवींद्र प्रभुदेसाई साहेबांनी स्वतःच्या पुढाकाराने आपल्या ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या जागेची अडचण तात्पुरती दूर केली. या त्यांच्या सहकार्याने त्यांच्या पितांबरी क्रिएटिव्ह स्टुडिओच्या जागेत ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे तात्पुरते कार्यालय कार्यरत झाले आहे.

ठाणे संघाच्या कार्यालयाचा नवीन पत्ता हा खालीलप्रमाणे असेल याची नोंद घ्यावी.

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे, द्वारा... पितांबरी क्रिएटिव्ह स्टुडिओ, १०४, पहिला मजला, लक्ष्मी निवास, बेडेकर विद्यालयाजवळ, गोखले हॉलच्यासमोर, बाजीप्रभू देशपांडे मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)**

शनिवार : दि. ५/१२/२०२० रोजी श्रीगणेश पूजनाने या नवीन तात्पुरत्या जागेत स्थलांतर केले आहे. १ जानेवारी, २०२१ पासून सायंकाळी ६.३० ते ८ या वेळेत पूर्णपणे कार्यान्वित होईल याची नोंद घ्यावी.

# दुर्लक्षित आचार्य

**प्रतिभा प्रभुदेसाई,** रत्नागिरी, मो. ९४०३३६२३३६

स्कॉटलंडच्या युनिव्हर्सिटीमध्ये एका भारतीय व्यक्तीचा २०० वर्षांपूर्वी लिहिलेला अर्ज आदरपूर्वक जतन करून ठेवलेला आहे. नामवंत एल्फिन्स्टन कॉलेजच्या प्राध्यापक पदासाठी केलेला तो अर्ज होता. नोकरीचा किरकोळ अर्ज संग्रहालयात ठेवण्याइतपत प्रभावीपणे मांडणाऱ्या एका मराठी बुद्धिवंताचा थोडक्यात परिचय...

ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या पारतंत्र्यात भारत सखोल बुडालेला असतानाच ६ जानेवारी १८१२ साली आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म झाला. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात वाघोटन खाडीच्या किनाऱ्यावर 'पोंभुर्ले' गाव आहे. या गावात अतिशय गरीब कुटुंबात त्यांचे बालपण गेले. हालाकिची परिस्थिती असतानाही आई सगुणाबाई आणि वडील गंगाधरशास्त्री यांनी त्यांना शाळेत घातले आणि पुढे इतिहास घडला.

जन्मजात अफाट बुद्धिमत्ता लाभलेले बाळशास्त्री शालेय जीवनात प्रचंड वेगाने विद्याभ्यास करू लागले. पाठांवर दांडगे असल्यामुळे स्वतःच्या इयत्तेतील पुस्तके समजून घेतल्यानंतर पुढच्या दोन दोन इयत्तांमधील अभ्यास ते एकत्रितरित्या करू लागले. त्यांची तल्लख बुद्धिमत्ता पाहून सर्वजण त्यांना 'बालबृहस्पती' म्हणू लागले. १८२६ साली त्यांनी मुंबई एज्युकेशन सोसायटी या इंग्रजी शाळेत प्रवेश घेतला. त्यांच्या सखोल अभ्यासामुळे वयाच्या १४ व्या वर्षी त्याच शाळेत गणिताचे शिक्षक म्हणून त्यांना नोकरी मिळाली आणि ती सुद्धा पगारी. परंतु फक्त गणितेय बुद्धिमत्तेपुरते आपले ज्ञान त्यांना मर्यादीत ठेवायचे नव्हते आणि त्यामुळेच विविध भाषा शिकण्याचा त्यांनी सपाटा सुरु केला. जिज्ञासेमुळे अल्पावधीतच मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराथी, कानडी, तेलगू, इंग्रजी, पारशी, फ्रेंट, लॅटिन, ग्रीक, उर्दू या सर्व भारतीय आणि परदेशी भाषांवर त्यांनी प्रभुत्व मिळविले. हे कमी पडले म्हणून की काय त्यांनी खगोलशास्त्राचा अभ्यास सुरु केला आणि त्यातही ते पारंगत झाले. ज्योतिषशास्त्रावर सुद्धा त्यांनी आपली पकड घट्ट केली. बॉंबे नेटिव्ह सोसायटीचे बापू छत्रे त्यांचे शिक्षक. १८३० साली वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी बाळशास्त्री बॉंबे नेटिव्ह सोसायटीचे 'डेप्युटी सेक्रेटरी' झाले.



१८३४ साली एल्फिन्स्टन महाविद्यालयाची स्थापना झाली. त्या महाविद्यालयात रुजू होणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे पहिले मराठी साहाय्यक प्राध्यापक. गणित, भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र हे अवघड विषय ते शिकवायचे. दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी लाड हे आचार्य बाळशास्त्री यांच्या हाताखाली शिकून गेलेले काही महान विद्यार्थी. एल्फिन्स्टन महाविद्यालयात रुजू होण्यापूर्वी आपल्या जन्मदिनी ६ जानेवारी १८३२ साली त्यांनी 'दर्पण' हे द्विभाषिक वर्तमानपत्र मुंबईत काढले. महाराष्ट्रातील हे पहिले मराठी वर्तमानपत्र ! त्यापूर्वी १७७९ पासून 'बॉंबे हेरॉल्ड' हे महाराष्ट्रातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र उपलब्ध होते. परंतु मराठी भाषेमध्ये दर्पण हेच पहिले वर्तमानपत्र बनले. एका बाजूला इंग्रजी आणि दुसऱ्या बाजूला मराठी मजकूर अशा दोन भाषेत हे वर्तमानपत्र होते. जांभेकरांचे वर्गमित्र भाऊ महाजन त्यातील इंग्रजी भाग संपादित करत. सुरुवातीला दर्पण हे पाक्षिक होते. ४ महिन्यानंतर ते साप्ताहिक बनले. याचा आकार १९ इंच लांब आणि साडे एकोणीस इंच रुंद असा होता. एकूण आठ पानांच्या या साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी ६ रुपये होती. दर्पणचा खप ३०० प्रति इतका अत्यल्प असला तरी त्या काळात इतर प्रतिथयश वृत्तपत्रांचा अधिकतम खप ४०० प्रति इतकाच होता.

दर्पणमुळे मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रचली गेली. पहिले मराठी पत्रकार होण्याचा मान अर्थातच आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना त्यांच्या दूरदृष्टीमुळे मिळाला. ते 'दर्पणकार' या नावाने आजही ओळखले जातात आणि त्यांचा जन्मदिवस 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो. दुर्दैवाने १ जुलै १८४० रोजी 'लास्ट फेअरवेल' हा लेख लिहून दर्पणचा प्रसार थांबला. 'लिमिटेड सर्व्हिस गॅझेट अँड लिटररी क्रोनिकल' या पत्रात अखेरीस दर्पण विलीन करण्यात आले.

'विद्या हे बळ आहे' असे मानणाऱ्या बाळशास्त्रींनी त्यानंतर 'दिग्दर्शन' हे शैक्षणिक मार्गदर्शन करणारे मासिक काढले. हे सुद्धा दर्पण प्रमाणेच इंग्रजी व मराठी अशा दोन भाषेत विभागलेले होते. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, व्याकरण, गणित, भूगोल, इतिहास या विविध शाखेतील विषयांवर बाळशास्त्री दिग्दर्शनमध्ये मार्गदर्शन करत. त्यांचे वर्गमित्र भाऊ महाजन यांनी त्याच वर्षी 'प्रभाकर' नावाचे मराठी मासिक काढले. संपूर्ण मराठीत असलेले महाराष्ट्रातील हे पहिले मासिक. लोकहितवादींची गाजलेली १०८ शतपत्रे याच मासिकात छापली गेली. एकंदरीतच बाळशास्त्री यांच्या दूरदृष्टीमुळे मराठी वृत्तपत्र समूहाने आकार घेतला.

वर्तमानपत्रापुरते मर्यादित न राहता बाळशास्त्रींनी पुस्तके लिहिण्याचा उपक्रम हाती घेतला. महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळासाठी विविध भाषेतील शालेय पाठ्यपुस्तके निर्मिती करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. इतिहास, भूगोल, गणित, छंदशास्त्र, नीतिशास्त्र या विषयांवर त्यांनी पुस्तके लिहिली. बालव्याकरण सारखी मराठी पाठ्यपुस्तके सर्वप्रथम त्यांनी बनवली. फक्त शाळकरी अभ्यासक्रमापुरते न थांबता उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी पुस्तके लिहिली. इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना फेफरे आणणाऱ्या गणितातील अवघड डिफरनसीएल कॅलक्यूलस सारख्या अवघड विषयावर आधारित 'शून्यलब्धी' हे पहिले पुस्तक त्यांनी लिहिले. प्रतिष्ठीत रॉयल एशियाटिक सोसायटीच्या नियतकालिकांमध्ये बाळशास्त्रींचे लेख प्रसारित होत. असा मान मिळविणारे ते पहिलेच भारतीय होते.

शैक्षणिक क्षेत्रातून आध्यात्मिक क्षेत्रात पाऊल टाकत १८४५ साली बाळशास्त्री जांभेकर यांनी ज्ञानेश्वरीचे पाठभेदांसहित संपादन करून ज्ञानेश्वरीची पहिली छापील प्रत जगाला उपलब्ध करून दिली. त्याचमुळे त्यांना ज्ञानेश्वरीचे आद्यप्रकाशक म्हणून ओळखले जाते. कोकणात गावागावात जाऊन विविध भाषांमधील उपलब्ध ताम्रपटाचे वाचन करून इतिहास लेखन करण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले. या त्यांच्या कार्यामुळे त्यांना आधुनिक भारताचे आद्य इतिहासकार म्हटले जाते. विधवा विवाहाचे ते समर्थक होते आणि त्यामुळेच राजा राममोहन रॉय यांचे ते चाहते होते. रॉय यांचे बंगाली भाषेतील लिखाण वाचता यावे फक्त यासाठी ते बंगाली भाषा शिकले. हिंदू धर्माचे कट्टर पुरस्कर्ते असलेले बाळशास्त्री धर्मांतर करणाऱ्या प्रवृत्तीच्या विरोधात होते. त्यांच्या काळात धर्मांतरावर गाजलेले शेषाद्री प्रकरण आजही चर्चेत आहे.

अंबाजोगाई येथील गोविंद शेषाद्री यांना दोन मुले होती. त्यापैकी मोठा मुलगा नारायण याला ख्रिस्ती मिशनरीजनी धर्मांतर करून ख्रिश्चन धर्मात सामील केले. त्यांचा धाकटा भाऊ श्रीपती पुढे त्याच मार्गावर निघाला होता. बाळशास्त्रींना याची माहिती मिळताच त्यांनी श्रीपतीला गाठले. जस्टीस पेरी यांच्यामार्फत त्याचा ताबा घेतला आणि त्याचे मनपरिवर्तन घडवले. त्याची मंजुरी मिळताच काशी येथे नेऊन त्याची शुद्धी करून त्याला पूर्ववत हिंदू धर्मात प्रवेश करवून घेतला. परंतु त्यानंतर त्यांच्यावर या कृत्याबद्दल कडाडून टीका झाली. ५७ दिवस यवनांकडे राहिलेल्या हिंदू व्यक्तीला पुन्हा धर्मात आणल्याबद्दल अखेरीस पुण्यात त्यांच्यावर बहिष्कार घालण्यात आला.

बाळशास्त्री तत्त्वाचे पक्के होते. मुंबई विभागाचे शाळा इन्स्पेक्टर म्हणून नियुक्ती झाली असताना एकदा पगारात एक रुपया जास्त दिला गेला. ही बाब त्यांनी संबंधित ब्रिटिश खात्याकडे कळवली व पुढील महिन्यात तो एक रुपया कमी देण्याची विनंती केली. परंतु पुढील

महिन्यात तो वाढीव रुपया वळता केला गेला नाही. असे चार महिने गेल्यानंतर बाळशास्त्री यांनी अधिकाऱ्यांना खरमरीत पत्र लिहून 'जोपर्यंत तुम्ही मला दिलेला अधिकचा रुपया जमा करत नाही तोपर्यंत मी पगार घेणार नाही' अशी धमकीच दिली. या त्यांच्या पत्रामुळे अधिकारी हबकलेच.


बाळशास्त्री यांनी अनेक पदे भूषविली. शिक्षक ट्रेनींग स्कूलचे ते संचालक होते. कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. १८४० साली त्यांना जस्टीस ऑफ पीस बहाल करण्यात आले. याद्वारे तंटे सोडवण्याची कायदेशीर जबाबदारी त्यांना मिळाली. विद्यमुकुटमणी, पश्चिम भारतातील आद्यकृषी अशा विविध पदव्या लोकांनी त्यांना दिल्या. बाळशास्त्री यांनी विविध विषयांवर वैविध्यपूर्ण पुस्तके लिहिली. इंग्लंड देशाची बखर (१८३२), ज्योतिषशास्त्र (१८३५), बाल व्याकरण (१८३६), भूगोल विद्या (१८३६), सार संग्रह (१८३७), नीती कथा (१८३८), हिंदुस्थानचा इतिहास (१८४६), हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास (१८४९), हिंदुस्थानातील इंग्रज राज्याचा इतिहास, शून्यलब्धि, शब्दसिद्धी निबंध, मानस शक्ती विषयक शोध इत्यादी.

दुर्दैवाने आचार्य बाळशास्त्री अल्पायुषी ठरले. १८ मे १८४६ रोजी वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. कोकणातील वनवेश्वर येथे इतिहासलेखन करत असताना ताप येऊन त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनाची बातमी येताच मुंबई उच्च न्यायाधीशाने कोर्टाचे कामकाज स्थगित करून त्यांना मानवंदना दिल्याची नोंद आहे. 'जिंदगी बडी होनी चाहिये लंबी नही !' ही म्हण आपल्या अल्पायुषी कारकीर्दीत कामाचा प्रचंड डोंगर उभारून बाळशास्त्री यांनी खरी केली. बाळशास्त्री यांचे कार्य अफाट आहे परंतु ते पुढे दर्लक्षितच राहिले. 'दर्पण'मुळे ते थोडेफार चर्चेत आले अन्यथा त्यांच्या विविधांगी कार्याची दखल भारतीय जनतेने फारशी घेतलेली दिसत नाही. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना भावपूर्ण आदरांजली !

**



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
इंटरनेटवरून त्यांना संपर्क
करताना त्रास होतो ?



आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात
कमी करू.

**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Antivirus Software
- Printers
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - c. Network
  - d. Printers
- Costomised Software Development

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

संपर्क
**Shantanu Gurjar**
9890990112
shantanu@sdsenterprises.net

# माझी फोटोग्राफी

**अशोक गोवारीकर**
ज्येष्ठ छायाचित्रकार, मो. ९८६९०३०६८४





पन्नाशीच्या दशकामध्ये मी आमच्या स्टुडिओमध्ये प्रथम माझ्या मोठ्या बंधूंबरोबर व नंतर १९५६ ते १९५८ मध्ये स्वतंत्रपणे स्टुडिओ चालविला. कोल्हापूरला बिंदू चौकामध्ये 'गोवारीकर लकी फोटो' या नावाने आमचा फोटोग्राफीचा स्टुडिओ होता. फोटोग्राफीला लागणारे सर्व सामान आमच्याकडे मिळत असे. कोडॅक, इस्फोर्ड, गेव्हर्ट अशा जगप्रसिद्ध कंपन्यांची डीलरशिप आमच्याकडे होती. आजच्या काळातले डिजिटल कॅमेरे, कोणत्याही मोबाईलने फोटोच काय पण चलतचित्र काढता येणे आदी सोयींमुळे तो जुना काळ म्हणजे अतिशय मागासलेला असा वाटेल; पण त्याही काळात एक मजा होती, एक थ्रिल होते आणि भरपूर स्किल (कौशल्य) होते. त्याकाळी कोल्हापूरमध्ये पठाण फोटोग्राफर, डी. डी. बराले, बागी फोटोग्राफर, शाहूपुरीमध्ये बी. पी. पाटील, महाद्वार रोडवर चौगुले वगैरे बरेच फोटोग्राफर्स होते. काहींच्याकडे फोटोग्राफी फक्त दिवसा होत असे. कारण विजेची व्यवस्था नव्हती. इमारतीच्या छपरावर काही कौले काढून तिथे काच लावलेली असायची व त्या प्रकाशामध्ये फोटो घेतले जायचे. ज्यांच्याकडे विजेची सोय होती, त्यांच्या दुकानावरच्या पाटीवर 'येथे दिवसा व रात्री फोटो काढण्यात येतील' असे लिहिलेले असायचे.

फोटोग्राफीचा शौक त्या काळातल्या राहणीमानाचा विचार केला, तर तसा थोडा महागडाच होता. त्यामुळे फार थोडे लोक कॅमेरा विकत घेत. कोडॅक कंपनीचा 'बॉक्स' कॅमेरा फक्त दहा रुपयाला मिळत असे. अर्थात दहा रुपयेही त्याकाळी खूप मौल्यवान होते. इयुआफ्लेक्स नावाचा दुसरा कॅमेरा पन्नास रुपयाला होता. म्हणजे चांगलाच महाग होता. स्टुडिओमध्ये वापरण्याचे कॅमेरे हे वेगळे होते. कोडॅक अथवा 'झाइस' (लेन्स बनविणारी फार नामांकित जर्मनी कंपनी) कॅमेरे असत व त्यामध्ये प्लेटस् घालाव्या लागत. काचेवर रसायन लावून त्यावर फोटो घेणे असा हा प्रकार होता. त्या आकाराच्या फिल्म्स पण येत असत, पण प्लेटस् जास्त प्रमाणात वापरल्या जात. या निगेटिव्हचा आकार चार बाय सहा, सहा बाय आठ असा मोठा असे. यामध्ये फायदा एवढाच होता की, यावर ग्रुप फोटो घेऊन त्याची थेट त्याच आकाराची प्रत तयार करता येत असे आणि त्यामुळे चित्र अधिक रेखीव आणि अधिक सुस्पष्ट येत असे. शिवाय निगेटिव्हवर आर्टिस्टकडून अजून थोडीशी सुधारणा करण्यास सोयीचे होत असे. त्याकाळात चेहऱ्यावर देवीचे व्रण असलेली किंवा एका डोळ्यांमध्ये फुल पडलेली माणसे बऱ्याच प्रमाणात दिसत असत. आता देवीच्या रोगाचे पूर्ण उच्चाटन झाल्यामुळे ही समस्या नाही. त्यामुळे आर्टिस्टकडून निगेटिव्हला 'रिटचिंग' करून असे व्रण कमी करणे व घालविणे जरुरीचे असे. कित्येक लोक विशेषतः खेड्यातले तेव्हा रविवारी बाजाराला येत, तेव्हा त्यादिवशी चांगला धंदा झाला या आनंदात फोटो काढण्यास येत. त्यांची दाढी एक-दोन दिवसांची वाढलेली असे. त्यांनाही या अशा 'रिटचींग'ची जरुरी असे.

एखाद्या व्यक्तीचा 'बस्ट' फोटो म्हणजे 'अर्धा' फोटो घ्यायचा असेल, तर रोलफिल्मचे कॅमेरे वापरत असत. आमच्या स्टुडिओत 'रोलिकॉर्ड' व 'रोलिफ्लेक्स' असे त्याकाळातले जर्मन बनावटीचे उत्कृष्ट कॅमेरे होते. अर्धा फोटो म्हणजे चेहरा व खांदे आणि छातीपर्यंतचा, बेंबीच्या थोडा वरपर्यंतचा भाग फोटो

काढण्याआधी गिऱ्हाईक दिलीपकुमार अथवा राजकुमार किंवा देवआनंद यांच्या एखाद्या वर्तमानपत्रातील फोटो प्रमाणे पोज घेऊन तसा फोटो काढावा अशी फरमाईश करीत असत. कधी एखाद्याच्या घरी त्याची प्रिय व्यक्ती मरण पावल्यास लक्षात येत असे की, त्यांचा एकही फोटो आठवण म्हणून नाही. मग आम्हाला बोलावण्यात येत असे व दोन-चार वेगवेगळ्या अँगलनी फोटो काढण्यास सांगत. विशेषतः खेड्यातून अशा ऑर्डर्स जास्त येत असत.

एकदा एका खेड्यामध्ये मध्यरात्री एक वृद्ध गृहस्थ मरण पावले. त्यांचा एकही फोटो नव्हता. सर्व नातलग, सगे-सोयरे, मित्रमंडळी म्हणाली की, आता तरी एक फोटो काढून ठेवू. मृतावस्थेत का होईना पण असावा. कारण पुढच्या पिढीला ते दिसायला कसे होते त्याचा अंदाज तरी येईल. झालं... अंत्यसंस्कार थांबले. सकाळी स्टुडिओ (८.३० वाजता) उघडला, तेवढ्यात दोन-तीन मंडळी आली व म्हणाली, 'चला... मढ्याचा फोटो काढायचा आहे.' गाव रंकाळ्याच्या पुढे वाशी नाका सोडल्यावर सात-आठ मैलांवर होते. पोहोचेपर्यंत १०.३० ते ११.०० वाजले. घरातल्या खोलीमध्ये चटईवर मृतदेह होता. उजेड कमी होता. फ्लॅशची पद्धत सरावात नव्हती व खर्चिकपण समजली जात असे. मी त्यांना तो मृतदेह बाहेर उघड्यावर आणण्यास सांगितले. तेव्हा एकाला कल्पना सुचली की, मृतदेह खुर्चीवर बसवून दोन्ही बाजूला नातलग उभे राहतील, म्हणजे ग्रुप फोटोसारखा निघेल; पण रात्री केव्हातरी मृत्यू झाला असल्याने मृतदेह ताठरला होता. तो कमरेमध्ये वाकेना व खांद्याकडून उचलण्याचा प्रयत्न केल्यावर सरळ, ताठ उभे राहू लागला. मग त्यांच्या दोन मुलांना दोन बाजूंनी त्यांच्या खांद्यामध्ये बखोटे धरून तो मृतदेह उभा केला व फोटो घेतला. मग त्या कल्पक नातेवाईकाने सांगितले की, 'आता फोटो तयार कराल त्यावेळी त्यांना तुम्ही डोळे काढा, म्हणजे फोटो जिवंतपणी काढल्यासारखा दिसेल.'

आमचे रिटचिंग आर्टिस्ट बळवंतराव घुगरे नावाचे होते. ही मंडळी आर्टिस्ट म्हटले तरी खऱ्या अर्थाने आर्टिस्ट नसत. निगेटिव्हवर एका खास पेन्सिलने असमान असे काळे, पांढरे धब्बे वगैरे थोड्या प्रमाणात कमी करणे फोटोवर आलेला एखादा पांढरा अगर तत्सम डाग थोड्या प्रमाणात कमी करणे अथवा मिटविणे एवढ्यापर्यंतच त्यांची कलाकुशलता असे. प्रिंट बनल्यावर मी त्यांना म्हटले, ''बळवंतराव, या मंडळींनी या मृतदेहाला डोळे काढायला सांगितले आहे. जमणार का ?'' बळवंतरावांनी अत्यंत आत्मविश्वासाने ''हत्तीच्या... त्यात काय विशेष ? काढूयात की,'' म्हणून उत्तर दिले आणि फोटो घेऊन घरी गेले व दुसऱ्या दिवशी आणून दिला. बघितल्यावर मी हादरलोच. तो मृतदेह फार भेसूर दिसत होता. बळवंतराव त्यांच्या कौशल्यावर खूश होते. शाळेत जाणाऱ्या मुलांच्या रंगपेटीतला काळा आणि पांढरा वॉटर कलर वापरून ते डोळे अतिशय कलाहीन पद्धतीने, एखाद्या लहान मुलाने काढावेत असे काढले होते. गिऱ्हाईक फोटो घेण्यासाठी आल्यावर त्यांच्यासमोर मी घाबरत घाबरत तो फोटो ठेवला. त्यांना तो एवढा आवडला की, ते मला म्हणाले, ''मालक, आबा आमच्याकडेच बघत्यात असं वाटतंय... एकदम फस्सक्लास झालंय.'' बळवंतरावांनी डोळे काढण्याचे आठ आणे हक्काने घेतले व मीदेखील खुशीने दिले.

त्याकाळचे प्रख्यात नट चंद्रकांत मांढरे हे आमचे नेहमीचे गिऱ्हाईक. त्यांना फोटोग्राफीचा खूप छंद होता. त्यांनी काटकरांच्या मुलीशी लग्न केले. काटकर हे श्रीमंत इंदुमती राणीसाहेबांच्या विश्वासातले गृहस्थ. त्यांची ही कन्या त्यावेळी राजाराम कॉलेजमध्ये विद्यार्थिनी होती. अत्यंत आकर्षक व्यक्तिमत्त्व व फोटोसाठी उत्कृष्ट चेहरा असलेल्या मिस काटकरांचे आमच्या स्टुडिओमध्ये वेगवेगळ्या अंगल्समध्ये चार-पाच फोटो घेतले होते. त्याकाळच्या एखाद्या हॉलिवूडच्या नटीप्रमाणे ते फोटो आले. स्टुडिओमध्ये आलेल्या गिऱ्हाईकांना दाखविण्यासाठी फोटोचे अल्बम ठेवलेले असत. त्यामध्ये अशा आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे फोटो लावलेले असत. ते बघून गिऱ्हाईकांना वाटावे की,

आपलाही फोटो इतकाच छान येईल व ते फोटो काढून घेण्यास उद्युक्त होतील. मिस काटकरांचे फोटोही असेच त्या अल्बममध्ये लावले होते. एकेदिवशी चंद्रकांत मांढरे आले व एक रोल डेव्हलप करण्यास दिला व म्हणाले, ''मला रिझल्टस् लगेच दाखवा म्हणजे मग तुम्हाला मी कोणते प्रिंटस् पाहिजेत ते सांगतो. मी रोल डेव्हल्प करण्यास माझ्या माणसाकडे दिला. चंद्रकांतजी बसल्या-बसल्या अल्बम बघू लागले. बघता-बघता मिस काटकरांचे फोटो आले. ते एकदम गंभीर झाले. ते जे पाच-सहा फोटो होते, ते त्यांनी भराभर खेचून बाहेर काढले. मला काही समजेना. चंद्रकांतजी म्हणजे बडे प्रस्थ होते. मी आदबीने विचारले, ''काय झालं ?'' ते म्हणाले, ''हे फोटो यापुढे असे कुठे लावायचे नाही. ही माझी पत्नी आहे. या फोटोच्या निगेटिव्हजही मला द्या आणि याचं काय बिल असेल ते मला द्या. मी पैसे देतो.'' काय बोलावे, कशी सारवासारव करावी, अभिनंदन करावे की नाही, वगैरे काही समजेना. ''आम्हाला काय म्हायतीच नाय ओ!'' असे काहीतरी पुटपुटत ते फोटो आणि निगेटिव्हज् त्यांना दिले. पैसे अर्थातच घेतले नाहीत. ही गोष्ट पन्नाशीच्या दशकातील. वर्ष आठवत नाही, पण १९५५-१९५६ साल असावे. त्यानंतर पन्नास वर्षांनी २००५ च्या सुमारास, चंद्रकांतजींनी काढलेल्या निसर्गचित्रांचे प्रदर्शन नेहरू सेंटर वरळीला भरले होते. त्यावेळी मी व माझे कुटुंबीय गेलो होतो. वहिनी होत्या (चंद्रकांतजींचे निधन २००१ मध्ये झाले होते.) त्यांनी मला ओळखले नाही आणि मीही त्यांना एकदम ओळखले नाही. ते हॉलिवुड स्टाईल व्यक्तिमत्त्व नाहीसे झाले होते. मी, माझी पत्नी किशोरी, मुलगा आशुतोष व कन्या आश्लेषा असे चौघे त्यांना भेटलो. त्यांना आनंद झाला. खूप गप्पा झाल्या. त्यावेळी मी हा १९५५-५६ चा किस्सा सांगितला. त्यांना तो व्यवस्थित आठवत होता. त्या खूप हसल्या आणि म्हणाल्या, ''ज्या दिवशी तुमच्या स्टुडिओतून ते फोटो घेऊन घरी आले, त्यांनी मला सगळे सांगितले. म्हणाले, गोवारीकर घाबरले, त्यांना काय बोलावे समजेना. मग मीच त्यांना सांगितले की, आता हे फोटो लावायचे नाहीत.'' ते माझ्याबाबत फार पझेसिव्ह होते. मी आशुतोषला म्हटले, त्या काळात वहिनी रिटा हेवर्थ, एलिनॉर पारकर वगैरे नट्यांप्रमाणे दिसत होत्या. वहिनी म्हणाल्या, ''गेलं ते हॉलिवुड, कुठं गेलं पत्ता नाही.'' पुन्हा भेटायचे ठरले, पण भेट कधी होऊ शकली नाही.

महाद्वार रोडवर जोशीरावांच्या बिनखांबी गणेश मंदिराजवळ रॉयल हेअर कटिंग सलून हे गवळी कुटुंबाचे केस कापण्याचे दुकान पन्नासच्या दशकामध्ये फार लोकप्रिय होते. राजाराम कॉलेज आणि गोखले कॉलेजचे बहुसंख्य विद्यार्थी तिथे केस कापायला किंवा गप्पा मारायला वगैरे येत असत. दुकानात रेडिओ असल्याने बिनाका गीतमाला ऐकायला दुकान भरलेले असायचे. मोतीबाग तालमीमध्ये कुस्ती शिकायला आलेले सर्व पैलवान त्यांच्या वस्तादांच्याबरोबर तेथे येत असत. हिंदकेसरी गणपतराव आंदळकर त्यावेळी अगदी नवीन होते. वीस-एक वर्षांचे असावेत. उत्कृष्ट देखणी पर्सनॅलिटी. अत्यंत विनयशील व अदबशीर, चेहरा नेहमी हसरा. तेव्हापासून आमची सगळ्यांची त्यांच्याशी मैत्री. रोज सकाळी व संध्याकाळी ते त्यांच्या पंधरा-वीस सहकाऱ्यांबरोबर मोतीबाग तालमीतून बाहेर पडले की, रॉयल हेअर कटिंगमध्ये थोडावेळ गप्पाटप्पा करायला थांबत असत. त्यांचा एक चेला किंवा ज्युनिअर विश्वास अमणापूरकर नावाचा पैलवान होता. तो मला एकदा म्हणाला, ''आमच्या गावाला फोटो काढायला चला.'' सांगली जिल्ह्यामध्ये कुठेतरी ते गाव होते. मी त्याला सांगलीचाच फोटोग्राफर घेण्यास सांगितले, पण त्याचे म्हणणे असे पडले की, काम फार महत्त्वाचे आणि जोखमीचे होते म्हणून मीच येणे जरुरीचे होते. त्याने मला मग कामाचे स्वरुप सांगितले. १९५३-१९५४ चा हा किस्सा आहे. त्यामुळे जास्त डिटेल्स लक्षात नाहीत. विश्वासच्या कुटुंबाचे व त्याच्या दुसऱ्या दूरच्या नातलगाच्या जमिनीचा मालकीवरून तंटा चालू होता व केस कोर्टात साक्षीपुराव्यापर्यंत आली होती. त्याविरोधी नातलगांनी जमीन आपल्या दत्तक पुत्राच्या नावावर केली होती. विश्वासच्या वकिलांनी कोर्टामध्ये

असा पवित्रा घेतला की, हा दत्तक घेणारा माणूस जोगत्याचा व्यवसाय करतो. म्हणजे टोपलीमध्ये देव घालून, लुगडे नेसून दारोदार पैसे घेणारे लोक असतात, त्याप्रमाणे हा माणूस आहे. कोणत्यातरी कायद्याखाली किंवा कुठल्यातरी नियमाप्रमाणे हा माणूस जर देवऋषी वा जोगती असेल, तर तो दत्तक रद्द होत होता. एका खेड्यामध्ये तो जोगती एका विशिष्ट दिवशी येत असे. त्यावेळी त्याच्या नकळत फोटो घेण्याचे काम मी करायचे होते.

एक दिवस पहाटे पाचच्या आगगाडीने मी आणि विश्वास सांगलीला गेलो. तेथे त्याचे थोरले दोन बंधू व आणखी एक-दोन पैलवान वगैरे होते. तिथून आम्ही एका गावात गेलो. अगदी छोटे खेडेगाव. धड रस्ते नव्हते. मला एका पडक्या झोपडीत बसवले, म्हणजे लपून राहायला सांगितले.

दोनएक तासाने म्हणजे सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास तो जोगती येत असल्याचा निरोप आला. मी तयारीत बसलो. आजच्या डिजिटल कॅमेऱ्याप्रमाणे त्या काळी फटाफट फोटो घेता येत नव्हते. एक फोटो घेतला की कॅमेऱ्यामध्ये एक कळ दाबायची. मग फिल्म गुंडाळायची व पुढचा हिस्सा आणून त्यावर दुसरा फोटो घ्यायचा. तो माणूस समोरून आल्यावर पहिला फोटो घेतला व दुसऱ्याची तयारी करेपर्यंत तो मी लपलेल्या झोपडीच्या समोरून पुढे गेला. त्यामुळे दुसरा फोटो मागच्या बाजूने आला. दोन्ही फोटो छान आले. त्या माणसाचा चेहरा व्यवस्थित ओळखता येत होता. ते फोटो कोर्टात हजर केले गेले व चार-पाच महिन्यांनी मला साक्ष देण्यास बोलावले. दुपारी तीन वाजेपर्यंत माझी साक्ष संपली आणि मी कोल्हापूरला जाण्यासाठी निघतो म्हटले, तर विश्वासबरोबरचे पैलवान म्हणाले, ''थांबा, आपल्याला एका ठिकाणी जायचे आहे. तुम्हाला अर्ध्या तासात रिकामे करतो.'' मला वाटले, फोटो काढण्याचे काम असणार. बरे झाले. अजून गिऱ्हाईक मिळतेय वाटते. दोन-तीन गल्ल्यांमधून धुळीतून एका जुनाट वाड्यासारख्या घरी मला नेले. बरोबर विश्वास, त्याचे दोन भाऊ, पैलवान दोस्त वगैरे मंडळी होती. एक मध्यमवर्गीय, थोडेसे गरिबीकडे झुकलेले, असे ब्राह्मण कुटुंब होते. माझी ओळख करून दिली गेली. ''पोरगं चांगलं आहे. कोल्हापूरला फोटोचं दुकान आहे. घरी भाऊ-बहिणी वगैरे आहेत. गोखले कॉलेजमध्ये शिकतो पण आहे. वगैरे वगैरे'' माहिती पुरवली. नंतर पैलवान म्हणाले, ''कधी कसे योगायोग येतील सांगता येत नाही. देवाच्या मनात काय असते त्याचा कुणालाच पत्ता लागत नाही. आता हेच बघा की, हे फोटो काढायला म्हणून काय आले आणि संबंध कसे जुळून आले.'' मी थोडासा चक्रावलो आणि बराचसा घाबरलो. त्या कुटुंबप्रमुखांनी माझी चौकशी करण्यासारखे प्रश्न विचारले व नंतर आपल्या पत्नीची ओळख करून दिली व तिला खूण करून सांगितले, ''बोलावं.'' पत्नी आतल्या खोलीत गेली व १७-१८ वर्षाच्या मुलीला घेऊन बाहेर आली.

सामान्य रुप, सामान्य कपडे, सर्वच सामान्य. मलासुद्धा काय बोलावं, कुठे बघावं काही समजेना. लाजून चूर झालो. हे सर्व अनपेक्षित होते. ती मुलगी नर्व्हस नव्हती. कारण दुपारपासून तिला माहिती होते की, कोणीतरी तिला 'बघायला' येणार आहे. शिवाय. त्यापूर्वीही असे कार्यक्रम झाले असावेत. मुलीचे वडील मला म्हणाले, ''विचारा तिला काय तुम्हाला विचारायचं असेल तर.'' मी कसंतरी बोललो, ''अहो, माझ्यावर तीन भाऊ व त्यांच्यावर तीन बहिणी आहेत. त्यांची लग्न व्हायची आहेत आणि मी फक्त अठरा वर्षाचा आहे.'' पैलवानांनी माझे मनगट पकडले. म्हणाले, ''अशोकराव, त्याची तुम्ही काय काळजी करू नका. ते सर्व आम्ही बघतो. पोरगी तुम्हाला आवडली हाय नव्हं. मग गप्प बसा.'' मी पुटपुटलो, ''आहो तसं काही नाही. आज प्रथमच बघतोय आणि तुम्ही असं काय करताय'' तिकडे लक्ष न देता एका ताटातून एक डझन केळी, दोन पेरू, सुपारी वगैरे गोष्टी आणि एक कापडाचा पीस दिला. माझ्या अंगाला कापरे भरले होते.

विश्वासचे थोरले बंधू वासुदेवराव अमणापूरकर माझ्या एका बाजूला बसले होते. मी त्यांना कळवळून

म्हटले, ''आपण प्लीज निघूया. मला कोल्हापूरला जायला उशीर झाला तर स्टुडिओतलं काम थांबेल. मला प्लीज इथून न्या.'' त्यांना बहुधा माझी दया आली. त्यांनी निरोपाची भाषा केली व आम्ही सर्व निघालो.

कोल्हापूरला आल्यावर रॉयल हेअर कटिंगचे बाबुराव व वसंतराव गवळी यांना सगळी हकिकत कळल्यावर त्यांची व त्यांच्या दुकानात येणाऱ्या पैलवान मंडळींची हसून हसून पुरेवाट झाली. मग विश्वास अमणापूरकरकडून त्या कुटुंबाला नकार पोहोचवला. पुढे १९५८ च्या सुमारास आम्ही आमचा स्टुडिओ चंद्रकांच पाटील या गृहस्थांना विकला.

**(लोकमतच्या 'कोल्हापुरी कला' या सदरात १९ ऑगस्ट २०१४ मधील खुमासदार लेख.)**

**

## ✻ संस्थावृत्त ✻




**नमस्कार, कोरोनारुपी संकटकाळात प्रत्यक्ष भेटणे व जाहीर कार्यक्रम आयोजित करणे शक्य होणार नाही हे लक्षात आल्यावर कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड ह्या संस्थेने सभासदांचा मानसिक ताण थोडा कमी व्हावा व उत्साहाचे वातावरण तयार व्हावे या हेतूने सभासद व त्यांच्या कुटुंबियांसाठी ऑनलाईन चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा व गीतगायन स्पर्धा आयोजित केली होती. वेगवेगळ्या वयोगटांसाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेत तीन वर्ष वयाच्या बाल स्पर्धकांपासून ते सत्तरीच्या स्पर्धकांपर्यंत सर्वांनी भरभरून प्रतिसाद दिला होता.**

**ऑनलाईन स्पर्धांमुळे तयार झालेले उत्साहाचे वातावरण टिकावे, किंबहुना अजून वृद्धिंगत व्हावे या दृष्टीने संस्थेने कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्त 'शरदातील नक्षत्रं' ह्या ऑनलाईन गाण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रविवार, दिनांक १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता कार्यक्रम झाला. युट्युबच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे प्रसारण झाले होते. गेल्या दीड महिन्यात जवळपास अडीच हजार प्रेक्षकांनी युट्यूबवर या कार्यक्रमाचा आनंद घेतला आहे.**

**शरदातील नक्षत्रं या कार्यक्रमाच्या यशस्वीतेनंतर सभासदांनी दिवाळी निमित्ताने असाच कार्यक्रम करावा असा आग्रह केला होता. त्यामुळे रविवार, दिनांक २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता 'दिवाळी संध्या' ह्या ऑनलाईन गाण्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ह्याही कार्यक्रमाचे प्रसारण युट्यूबच्या माध्यमातून करण्यात आले होते. आतापर्यंत दोन हजारांहून अधिक लोकांनी 'दिवाळी संध्या' ह्या कार्यक्रमाचा युट्यूबवर आस्वाद घेतला आहे.**

**'शरदातील नक्षत्रं' व 'दिवाळी संध्या' ह्या दोन्ही कार्यक्रमांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व कलाकार हे कऱ्हाडे ज्ञातीचे असून संस्थेचे सभासद कुटुंबिय आहेत.**

**श्रीपाद सप्रे**
सचिव, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड
९८१९८११३९१

# 'तोचि खरा साधू... तोचि खरा संत..'

**श्री. विजय आंबर्डेकर,** मो. ९८१९८८५६६५
**अध्यक्ष, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ**
**कार्याध्यक्ष, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई**

स्व. यशवंतराव देवस्थळी तथा वाय. एम. यांना दीर्घ आजाराने बुधवार, दिनांक १८ नोव्हेंबर रोजी देवाज्ञा झाल्याची बातमी आली. ही बातमी मलाच काय पण अनेकांना तीव्र दुःख देणारी होती.

समाजातील गरजवंतांचा आधारस्तंभ आज निखळला होता. अनेक सामाजिक संस्थांना मदतीचा हात देऊन त्यांच्या कार्याला प्रोत्साहित करणारे व्यक्तिमत्त्व आज काळाच्या पडद्याआड गेलं होतं. विद्यार्थी आणि वृद्धांचा आधारवड त्यांना पोरका करून गेला होता. जांभूळपाड्याला सेवाभावनेने घराच्या सुखाचा अनुभव देणारा 'चैतन्य' वृद्धाश्रम उभा करून अनेक वृद्धांच्या जीवनात आनंद फुलविणारा माळी आज त्यांची सोबत सोडून खूप लांबवर गेला होता. आज या साऱ्यांच्या जीवनात खूप मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

यशवंतरावांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा मी फॅन आहे आणि ते कऱ्हाडे आहेत याचा एक वेगळाच अभिमान मला वाटत आला आहे. अशा थोर ज्ञातीबांधवाच्या कार्याची माहिती आणि त्यांचे मार्गदर्शन आम्हाला व ज्ञातीला लाभावे अशी आम्हा सर्वांची तीव्र इच्छा होती. मुंबई कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या वार्षिक कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून त्यांना निमंत्रण देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करावा असे आमच्या मनात होते. संघाचा पदाधिकारी म्हणून मला या निमित्ताने त्यांना भेटण्याचा योग आला.

संघाच्या कार्यक्रमात आपणास सन्मानित करण्याचा विचार मी या भेटीत बोलून दाखवला. त्यांच्या प्रसिद्धी पासून दूर राहण्याच्या स्वभावामुळे त्यांनी प्रथम नकार दिला. पण आम्ही आपल्या कार्याची दखल घेणं म्हणजेच आपल्यापासून प्रेरणा घेणं असून आपला सन्मान हा आमच्यासाठी कसा वंदनीय आहे ते समजावून सांगितल्यावर त्यांनी मी येईन पण फक्त पुष्पगुच्छ स्वीकारीन असे सांगितले. त्यांची विचारसरणी अत्यंत प्रगल्भ होती. ते स्पष्ट वक्ते होते. जीवनाकडे बघण्याचा त्यांचा मार्ग असामान्य होता. त्यांनी केलेल्या संबोधनप्रद भाषणात समाजाप्रती असलेल्या भावना, कर्तव्य आणि सामाजिक भान जपताना वाटचालीत येणारे अडथळे इत्यादी विषय निर्भीडपणे मांडले. ते देशाभिमानी, प्रामाणिक कार्यप्रणाली असणारे ठोस विचारवंत होते. ते अर्थशास्त्री आणि शिक्षणप्रेमी होते. एल. ॲण्ड टी. कंपनीत ते उच्च पदावर कार्यरत होते. ही कंपनी उभी करून नावारूपाला आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. एल. ॲण्ड टी. चे वाय.एम. म्हणून त्यांची ओळख होती. अशा महानुभावाला जवळून अनुभवण्याचे भाग्य आम्हाला लाभले हेही नसे थोडके.




मुंबई कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे भारतीय सैनिकांसाठी निधी गोळा करण्याचे ठरविण्यात आले होते. त्या निमित्ताने श्री. वाय. एम. सरांची रीतसर वेळ घेऊन आम्ही भेटण्यास जाण्याचे ठरविले. त्यांनी आग्रहाने घरी बोलावले असल्याने घरीच गेलो होतो.

इतके मोठे व्यक्तिमत्त्व असलेली व्यक्ती पण साधी राहाणी, विनयशीलता आणि आदरातिथ्य कसे असते याचा पुनः प्रत्यय अनुभवला. हे सारे

आमच्यासाठी शिकण्यासारखे होते. मी प्रत्यक्ष भेटीचं कारण सांगितले. कऱ्हाडे ब्राह्मण संघाने केलेल्या संकल्पाची कल्पना त्यांच्यासमोर मांडली आणि सहभागाची इच्छा प्रकट केली. त्यांनी क्षणभरच थांबून आपण आधी चहा घेऊया आणि मग पुढे बोलूया असे सांगून आतून चहा आणून आमच्या समोर ठेवला.

चहा घेतच, आपली माझ्याकडून काय अपेक्षा आहे ? असे त्यांनी विचारल्यावर आम्हाला काय उत्तर द्यावे ते सुचेना. तेव्हा मी त्यांना आपली जी काही इच्छा आहे त्याप्रमाणे आपणच ठरवावं असे सुचविल्यावर त्यांनी वैयक्तिक खात्याचं चेकबुक घेऊन आतून एका व्यक्तीला बोलावले. (*कदाचित ते त्यांचे खाजगी सचिव असावेत.) आणि त्यांना 'रुपये दहा लाखांचा' चेक बनवा, असे सांगितलं. हे ऐकून आम्ही चमकलोच. वैयक्तिक खात्यातून सैनिक वेल्फेअर फंडासाठी १० लाख देणाऱ्या दानशुरासमोर आम्ही बसलो होतो आणि त्यांची दानशूरता प्रत्यक्ष अनुभवत होतो. उत्स्फूर्त विचार आणि ते विचार प्रत्यक्षात उतरवणाऱ्या कृतीला आणि ते करणाऱ्या महामानवाला मनोमन वंदन करून आम्ही तेथून निघालो.

समाजाप्रती आणि भारतीय लष्कराच्या जवानांप्रति असलेलं विलक्षण प्रेम म्हणजे काय ते अनुभवताना मात्र आम्ही त्यांच्यासमोर नतमस्तकच झालो. जमा झालेल्या देणग्यांचे चेक, केंद्र सरकारच्या ताब्यात सुपूर्द करण्यासाठी संघाने काही दिवसांनी रवीन्द्र नाट्यमंदिर येथे एक भव्य-दिव्य कार्यक्रम आयोजित केला.

त्यांच्या या स्पृहणीय सहकार्याची दखल घेऊन त्यांना सन्माननीय अतिथी म्हणून निमंत्रित केलं खरं... पण त्यांनी माझ्या नावाचा व मी दिलेल्या रक्कमेसहित कोणताही उल्लेख करणार नसाल तरच मी हे आमंत्रण स्वीकारीन व मी तुमच्या इच्छेचा मान ठेवून उपस्थित राहीन, पण व्यासपीठावर बसणार नाही अन्यथा मी येणार नाही, हे निक्षून सांगितल्यावर आम्ही त्यांच्या विचाराचा सन्मान ठेवला. कारण त्यांच्यासारख्या कलियुगातील संताची उपस्थिती ही आमच्यासाठी वंदनीय व सन्माननीय देखील होती.


हा एक सुंदर अनुभव आज त्यांच्या पश्चात आपल्यासमोर मांडताना त्यांच्या अचानक जाण्याच्या कल्पनेने मला शब्दच सुचत नाही आणि म्हणूनच त्या बाबूजींनी म्हटलेल्या सुप्रसिद्ध गाण्याच्या ओळी आठवल्या...

''तोचि खरा साधू... *तोचि खरा संत...'

वाय. एम. तथा स्व. यशवंतराव देवस्थळी नावाच्या त्या अजरामर व्यक्तिमत्त्वाला मनःपूर्वक आदरांजली.

आदरणीय देवस्थळी सरांच्या परिवाराच्या दुःखात आम्ही सर्व कऱ्हाडे ज्ञातीबांधव सहभागी आहोत.

**



जिव्हाळा हा घरचा कळस आहे

माणुसकी ही घरातील तिजोरी आहे

गोड शब्द हे घरातील धनदौलत आहे

शांतता ही घरातील लक्ष्मी आहे

पैसा हा घरचा पाहुणा आहे

व्यवस्था ही घराची शोभा आहे

समाधान हेच घरचे सुख आहे



**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा**
**कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचा शैक्षणिक मदतीचा रक्कम रु. ३०,००० चा चेक कु. इला भाटे हिला देताना.**
**डावीकडून - श्री. आनंद भाटे, श्री. बाळासोा भाटे, कु. इला भाटे व श्री. अनिल काटदरे**

यंदा कोरोनाच्या महामारीमुळे ठिकठिकाणी ऑक्सिजन मशीन, व्हेंटीलेटर याची कमतरता भासत होती. अशा कठीण काळात सातारा कऱ्हाडे ब्राह्मण संघाने सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवून रा. स्व. संघ संचलित जनकल्याण समिती, सातारा यांना ऑक्सिजन मशीन मदत म्हणून दिले. तसेच दिवाळी फराळ मदतीसाठी रु. १०,००० ची रोख मदत केली.

याच कालावधीत मरण पावणाऱ्या व्यक्तींची संख्याही खूप मोठी होती. त्यावेळी अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीची तत्पर व चोख व्यवस्था ठेवणाऱ्या श्री बालाजी ट्रस्ट यांच्या कार्यात रु. १५,००० देणगी रुपाने दिले.



**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा**
**जनकल्याण समितीस ऑक्सिजन मशीन भेट देताना डावीकडून - श्री. बाळासोा भाटे, श्री. प्रविण देशपांडे (ज.क.समिती जिल्हा प्रमुख), श्री. अनिलराव काटदरे, सौ. प्राची शहाणे, सौ. फणसळकर, श्री. शेवडे, श्री. नानल**

# झाले मोकळे आकाश

**श्रीमती सुषमा चिंचाळकर,** पुणे, मो. ९१४६४८८३९७

आपलं मन मोकळं करण्याकरिता जर समोर जवळचं माणूस नसेल, तर दाबून ठेवलेल्या भावनांचा उद्रेक दुसरीकडे होऊ नये. त्यावर ताबा ठेवण्याकरिता असा कुठला तरी मार्ग, आपल्यालाच आपला शोधायला हवा... पहाटे फिरायला जाताना रोजच्याप्रमाणे मी माझ्याच तंद्रीत चालले होते. पुलावर अंधार होता. अजूनही पहाटे बोचरी थंडी होती. यामुळे पहाटे ५.३० वाजता रस्त्यावर चिटपाखरुही नसायचे.

अचानक जोरजोरात बोलण्याचा आवाज ऐकू आला. इतक्या पहाटे कुणाचं भांडण चाललंय ? नि पुलावर तर वस्तीही नाही. म्हणून मी इकडेतिकडे बघितलं, तर कुठेही जाग नव्हती किंवा रिक्षा नव्हती. माझी विचाराची तंद्री तुटली म्हणून मी जरा नाराजीनेच पुन्हा चालू लागले, तर एका सुरात जोरजोरात शिव्या दिल्याचे आवाज स्पष्ट ऐकू येऊ लागले. जरा जवळ पोचल्यावर दिसले, त्या अंधारत एक माणूस पुलाच्या मध्यावर नदीकडे तोंड करून एकटाच हातवारे करीत जोरजोरात बोलत होता. थोडं थबकून मी ऐकू लागले. तो शासनाला, कॉर्पोरेशन, त्यातील अधिकारी, न्यायप्रक्रिया यांच्या नावाने तावातावाने शिव्याशाप देत होता. लाखोली वाहत होता.

तसं बघायला गेलं तर त्या वेळेस त्याच्या ओरडण्याचा कुणालाच काही त्रास होत नव्हता. महागाई, कामातील दिरंगाई, वेळकाढूपणा, पुनःपुन्हा करायला लागणारी पायपीट, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, सतत करायला लागणाऱ्या तडजोडी या साऱ्या साऱ्याचा संताप त्याच्या बोलण्यात होता.

मला फारसं आश्चर्य वाटलं नाही. कुठल्याही यंत्रणेबद्दल, त्यांच्या कामाच्या पद्धतीबद्दल, त्यातील त्रुटीबद्दल आपल्याही मनात अनेकदा चीड, संताप, असंतोष, असतोच... विशेषतः जेव्हा आपले काम होत नसते. तेव्हाही त्या अधिकाऱ्यासमोर किंवा तेथील व्यवस्थेबद्दल तेथे आपल्याला काहीच बोलता येत नाही. पटत नसूनही मान हलवावी लागते. गोड बोलावं लागते. रागाच्या, चिडीच्या साऱ्या भावना मनातच दाबून ठेवाव्या लागतात.



त्याचा उद्रेक मग तिसराच कुठेतरी आपल्या कनिष्ठांवर किंवा बायको-मुलांवर निघतो. किंवा तेही टाळल्यास तो ताण कुठेतरी निघणारच. नाहीतर त्याचा शरीरावर, तब्बेतीवर तरी परिणाम होणार.

हे सारं टाळण्यासाठी त्या व्यक्तीने अनुसरलेला मार्ग किती साधा पण परिणामकारक होता ! आपल्या मनातील 'भडास' तर त्याने काढलीच, पण त्यामुळे कुणीही दुखावले गेले नाही, त्याचा कुणालाही त्रास झाला नाही. पहाटेचा वेळ असल्याने कुणीही याच्याकडे विचित्र नजरेने पाहणारे नव्हते.

मला त्या क्षणी दोन प्रसंग आठवले. एक नसरुद्दीन शहाच्या 'चला मुरारी हिरो बनने' या चित्रपटात तो एक साधा रिक्षावाला असतो; पण त्याच्या उद्वेगाच्या, दुःखाच्या वा आनंदाच्या प्रसंगी तो जंगलात जाऊन एका झाडाला घट्ट मिठी मारून जेवढ्या जोरात ओरडता येईल तेवढ्या जोराने ओरडून, आपल्या भावनांना वाट मोकळी करून देत असतो.

दुसरा प्रसंग वेश्यावस्तीतील एका स्त्रीने सांगितलेला. तेथे एक गिऱ्हाईक यायचे. तो नियमाप्रमाणे पैसेही द्यायचा, पण खोलीत आल्यावर

तो त्या नेहमीच्या स्त्रीला एका खुर्चीत बसवायचा व तिच्यासमोर उभा राहून तिला शिव्यांची लाखोली वाहायचा. साधारणतः १५-२० मिनिटे. त्या काळात तो तिला कोण समजत असे कुणास ठाऊक ! सारा राग तिच्यावर काढून तिला स्पर्शही न करता तो निघून जायचा. त्याची तिलाही सवय झाली होती. ती काही विचारत नसे. पण त्यामुळे कदाचित त्याचे कुटुंबिय किंवा त्याच्या हाताखाली काम करणारे त्याच्या रागापासून बचावले जायचे.

बऱ्याचदा आईही सासू-नवऱ्याचा राग मुलांना धपाटे घालून काढतेच ना ! हे सारं आठवायचं कारण एवढंच, आपलं मन मोकळं करण्याकरिता जर समोर जवळचं माणूस नसेल, तर दाबून ठेवलेल्या भावनांचा उद्रेक दुसरीकडे होऊ नये. त्यावर ताबा ठेवण्याकरिता असा कुठला तरी मार्ग आपल्यालाच आपला शोधायला हवा... जसा या लोकांनी शोधलाय.

**

मोबाईल्स :
९९७५६२२६९६
९०२८८५०३७३

**हार्दिक शुभेच्छा !**

करंबेळकर यांचे हॉटेल

# अभिरुची

लंच होम ॲण्ड स्नॅक्स



**ऑर्डरप्रमाणे उकडीचे मोदक व पुरणपोळी मिळेल.**

**व्हेज**

शॉप नं. ३, २२५, सोमवार पेठ, नगर वाचनालयासमोर,
राजवाडा परिसर, सातारा ४१५ ००२

हार्दिक शुभेच्छा !

**प्रोप्रा. : सौ. वैदेही करंबेळकर**
**मो. ९४२३१३६४८१**

# आर्या फूड प्रॉडक्टस्

२२, व्यंकटपुरा पेठ, सातारा





* **उत्पादक** *

दर्जेदार, स्वादिष्ट व रुचकर शेंगदाणा, डिंक, ड्रायफ्रूट, खजूर
नाचणी कोको लाडू व पाचक सुपारी. याशिवाय दिवाळी फराळ

* **वितरक** *

**मे. बी. ए. काटदरे, सातारा * अग्रज फूड, कर्वेनगर व पद्मनाभ एंटरप्रायजेस, कृष्णा हॉस्पिटलजवळ, पुणे**

# आयुष्यमान व्हा !

महाराष्ट्र आणि मुंबई संघाकडून रणजी सामने खेळलेले अव्वल फिरकी गोलंदाज आणि मधल्या फळीतील फलंदाज रघुनाथ रामचंद्र चांदोरकर यांनी आज आयुष्याचे शतक पूर्ण करून १०१ व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले...

नागरी अभिवादन न्यासाने यंदाच फेब्रुवारी महिन्यात डोंबिवलीतील चार शतकवीरांचा नागरी सन्मान त्यांच्या घरी जाऊन केला होता. त्यात बापू चांदोरकरांचा समावेश होता. डोंबिवलीकर असलेले बापू चांदोरकर १९४३-४४, १९४६-१९४७ व १९५०-१९५१ च्या मोसमात सात रणजी स्पर्धा खेळले होते.

त्यांच्या शतकपूर्तीची बातमी इंग्रजी-मराठी वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केल्यामुळे आज बापूंना शुभेच्छा देण्यासाठी चाहत्यांची मोठी रीघ लागली होती. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे खास पुण्याहून प्रतिनिधी पाठवून चांदोरकरांचा सन्मान केला. लवकरच होऊ घातलेल्या भारत ऑस्ट्रेलिया सामन्यांच्या निमित्ताने बनवण्यात आलेली विशेष कॅप चांदोरकांना सन्मानपूर्वक भेट देण्यात आली. त्याचबरोबर त्यांच्या कारकीर्दीचा गौरव करणारे पत्रही असोसिएशनच्या वतीने अर्पण करण्यात आले. या आधी फक्त दोघा क्रिकेटपटूंनी वयाची शंभरी ओलांडली होती. त्यात प्रा. दि. ब. देवधर (पुणे), वसंत रायजी (मुंबई) यांचा अंतर्भाव होता.

त्यानंतरचे चांदोरकर हे तिसरे. देवधर यांच्या नेतृत्वाखाली चांदोरकर यांनी पुण्यातील एस.पी. महाविद्यालय व पी.वाय.सी. जिमखान्यासाठीही सामने खेळले होते. १९४६ साली लिंडसे हॅसेटच्या नेतृत्वाखाली आलेल्या ऑस्ट्रेलिया संघाविरुद्धही वेस्टर्न मराठा संघातर्फे ते खेळले होते.

वयाच्या ७३ व्या वर्षी ठाणे-डोंबिवली क्रिकेट संघासोबत ते केनियाच्या दौऱ्यावरही गेले होते. क्रिकेटप्रमाणेच फुटबॉल, हॉकी अशा खेळातही ते अग्रेसर होते. महाराष्ट्राकडून क्रिकेटसाठी निवड झाली तेव्हाच त्यांची महाराष्ट्राच्या फुटबॉल संघातही निवड झाली होती पण त्यांनी क्रिकेटला प्राधान्य देऊ केले.



मुंबईत पुरुषोत्तम शिल्ड, कांगा लीग स्पर्धात ते जसे खेळले तसेच त्यांनी माधव आपटे यांच्यासोबत केलेली विक्रमी भागीदारी खूप गाजली होती.

गेली काही वर्षे स्नुषा सुनीता हिच्या घरी चांदोरकर राहात असत. डॉ. जयश्री सप्रे (अमेरिका) व कै. डॉ. भाग्यश्री हर्डीकर या त्यांच्या कन्या. माझगांव येथे विजय ग्लास वर्क्स हा त्यांचा व्यवसाय होता. त्यांचे वडील हे तळेगावच्या पैसा फंड काच कारखान्याचे महाव्यवस्थापक होते.

चांदोरकरांचा जन्म २१ नोव्हेंबर १९२० रोजी कर्जत (जिल्हा नगर) येथे झाला. आजारपणामुळे अंथरुणालाच खिळून असलेले चांदोरकर क्रिकेटचे सामने मात्र उत्साहाने पहात असत. कोविड-१९ च्या कालावधीत त्यांची सेवा करण्यासाठी येणारे मदतनीस येऊ न शकल्याने त्यांचा मुक्काम अंबरनाथ येथील ‘कमलधाम’मध्ये आहे.

आज झालेल्या अनौपचारिक सन्मान सोहळ्यास डोंबिवलीतील क्रिकेट रसिक, कमलधामच्या पूर्णिमा कबरे, बापूंचे नातू व पिंपरी चिंचवडचे महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, स्नुषा सुनीता, नात श्रद्धा शिंदे, नातसून अदिती, दोघी पणत्या आदी नातलग उपस्थित होते.

**संकलित**

**महाराष्ट्र टाईम्स, पुणे मधील बातमी**

## बायकोला किती किंमत द्यायची ... ??

# नाते अर्धांगीनीचे

एक रामलाल नावाचा घरगडी होता. तो आपल्या बायकोला खूप घाबरत असे. दिसायला हट्टाकट्टा होता पण तरीदेखील बायकोला घाबरत असे. एक दिवस मालकाने त्याला विचारले रामलाल तू बायकोला एवढा का घाबरतोस ? त्यावर त्याने उत्तर दिले, 'साहेब मी घाबरत नाही तर तिची कदर करतो, तिचा सन्मान करतो.' त्याचे हे बोलणे ऐकून मालक हसून म्हणाले, 'तिच्यामध्ये असे काय आहे, ना ती सुंदर आहे, ना ती सुशिक्षित आहे.' रामलाल म्हणाला, 'काही फरक पडत नाही... साहेब ती कशी आहे, यापेक्षा मला सगळ्यात प्रेमाचे नाते तिचेच वाटते.' त्याचे बोलणे ऐकून मालक म्हणाला, 'बायकोचा बैल आहेस, तिच्या पदराला बांधून घेतले आहे. स्वतःला आणि इतर सगळ्या नात्यांची किंमत नाही तुला.' रामलालने सगळे शांतपणे ऐकून घेतले आणि उत्तर दिले. 'साहेब आई-वडिल नातेवाईक नसतात, ते देव असतात. त्यांच्या सोबत नाते नसते निभवायचे, त्यांची पूजा करायची असते. भाऊ-बहिणी सोबत नाते हे जन्मजात असते. मैत्रीचे नाते हे स्वार्थाचे असते. आपलेच नाते पहा, फक्त पैसे आणि गरजेचे आहे, पण पत्नी कोणतेही नाते नसतानादेखील कायमची आपली होऊन जाते. आपले सगळे नाते सोडून ती आपल्यासोबत येते आणि आपले सगळं सुखदुःख एकत्र जगते आणि शेवटच्या श्वासापर्यंत सोबत करते.' एका नोकराचे आपल्या पत्नीबद्दल काय विचार आहेत हे मालक ऐकत होते. तो पुढे म्हणाला, साहेब पत्नी म्हणजे केवळ एक नाते नाही तर अनेक नात्यांचे भांडार आहे. जेव्हा ती आपली सेवा करते, आपल्यावर प्रेम करते तेव्हा ती एका आईप्रमाणे करते. जेव्हा ती जीवनातील चढ-उताराबद्दल सूचित करते आणि मी आपली सगळी कमाई तिच्या हातात देतो कारण मला माहित आहे की, ती आपल्या घराचे हित साधेल तेव्हा ती एका पित्यासारखी असते. तो पुढे म्हणाला, जेव्हा ती आपली काळजी घेते, आपले लाड करते, आपल्या चुकांवर रागावते, आपल्यासाठी खरेदी करते तेव्हा ती आपल्या बहिणीप्रमाणे होते. जेव्हा ती आपल्याकडे नवनवीन फरमाईश करते, नखरे करते, रुसते, हट्ट करते तेव्हा ती मुलीसारखी होते. जेव्हा ती आपल्यासोबत सल्लामसलत करते, कुटुंब चालवण्यासाठी सल्ले देते, भांडण करते तेव्हा एका मित्रासारखी होते. जेव्हा घरातील सगळे देणेघेणे, खरेदी, घर चालण्याची जिम्मेदारी उचलते तेव्हा ती एक मालकीण होते.' तो पुढे म्हणाला, 'आणि जेव्हा ती सगळ्या जगाला विसरून एवढेच नाही आपल्या मुलांना देखील सोडून आपल्या मिठीत येते तेव्हा ती प्रेमिका, अर्धांगिनी, आपला प्राण आणि आत्मा होते. जी आपले सर्वस्व आपल्या स्वाधीन करते. मी तिचा सन्मान करतो तर हे काही चूक करतो का साहेब ?' मालक सगळे बोलणे ऐकत होता. हे सगळे ऐकून तो स्तब्ध झाला. एका निरक्षर आणि गरिबीमध्ये जीवन जगणाऱ्या व्यक्तीकडून आज जीवनाचा नवीन विचार मिळाला होता. मालकाला कळले की, एवढा सन्मान तर तो त्याच्या पत्नीलाही देत नाही.

या त्याच्या विचारातून आपण सर्वांनी आपल्या कुटुंबाची काळजी घ्या. बायको तुमची आयुष्यभराची काळजी घेईल.

( Whats app **माध्यमातून**)

**



# कमाल शंभरी

**श्री. अमित शहाणे**
**कार्यवाह-कऱ्हाडे ब्राह्मण संघ,** पुणे, मो. ९९२२९०७०६८

कमला घाटे ह्यांना नुकतीच २८ डिसेंबर रोजी शंभर वर्ष पूर्ण झाल्याबद्दल आमच्या संघातर्फे त्यांचा एक छोटेखानी सत्कार करण्यात आला. शंभरी पूर्ण केलेल्यांच्या सत्काराला उपस्थित राहायचे माझी दुसरी वेळ. काय विलक्षण लोक आहेत ह्याचा पुनः प्रत्यय आला. शरीराने खंबीर आहेतच म्हणूनच शंभरी पूर्ण करू शकल्या पण कौतुक वाटतं ते मानसिक स्वास्थ्याचं. आपण एक वर्ष कोरोनामुळे एवढे चलबिचल झालो, गेल्या शंभर वर्षात असे कित्येक व्हायरस वेगवेगळ्या रुपात बघितले असतील.


आज त्यांच्या कुटुंबियांशी गप्पा मारताना, वाटताना खूप साध्या, पण अंमलात आणायला खरोखर अवघड गोष्टी समजल्या. मी आत्तापर्यंत अनेक श्रावण बाळ बघितले पण केवळ बायको नोकरी करते, मुलगी परदेशी आहे आणि आई एकटीच असल्याने बँकेतून व्ही.आर.एस. घेणारे सुधीर घाटे काका हे पहिलेच पाहिले. एखाद्या सासू सुनेचे संबंध कसे असावेत ह्याचं उत्तम उदाहरण म्हणजे मनीषा घाटे काकू. त्या सासूबाईंना आज्जी म्हणत होत्या, कदाचित मुलीमुळे (आज्जींच्या नातीमुळे) असावं, पण ज्या पद्धतीने त्यांच्याबद्दल भरभरून बोलत होत्या आणि त्यांच्या छोट्या छोट्या गोष्टी आणि आठवणी सांगत होत्या ते केवळ अविस्मरणीय. टीव्हीवरच्या टूकार सासवा सूनांच्या भांडणाऱ्या सीरिअल दाखवण्यापेक्षा असं काहीतरी दाखवा, म्हणजे लोकांना त्यातून प्रोत्साहन मिळेल.

...आणि साक्षात उत्सवमूर्ती. त्यांच्याबद्दल तर काय बोलायचं. नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये सुद्धा मतदान केलं म्हणून पेपरमध्ये फोटो छापून आलेला. अजून सुद्धा चष्मा न घालता बरंच वाचता येतं. जुन्या दहावी झालेल्या असल्या तरी इंग्रजी पेपर व्यवस्थित वाचतात. अजून सुद्धा सर्व गोष्टी आपल्या आपल्या करतात. थोडं विस्मरण होतं पण अजूनही एक ते तीस पाढे पाठ. लहानपणीच्या कविता पाठ, अक्षरशः चावी द्यायचा अवकाश. आत्ता शंभरी झाल्याबद्दल पण फोटो छापून आल्यावर दाखवल्याबरोबर 'अरे हा तर माझाच फोटो' अशी सहज टिप्पणी. ह्या सगळ्याचं गमक सुधीर काकांनी सांगितलं आणि ते म्हणजे स्ट्रेस फ्री आयुष्य. कधीच कुणाचं वाईट चिंतलं नाही किंवा कुणाबद्दल वाईट बोललं नाही. कुठलीच अपेक्षा नाही. म्हणजे सुधीर काकांनी शंभरावा वाढदिवस आहे म्हणल्यावर 'मग मला चॉकलेट आणशील ना ?' अशी बालिश प्रतिक्रिया. ह्या वयातसुद्धा रोज काहीतरी गोड लागतंच हे ऐकल्यावर तर थक्कच झालो. अजून जास्त ह्याबद्दल लिहित नाही, नाहीतर सगळे डाएटिशियन आणि मधुमेहाचे डॉक्टर माझ्या घरावर मोर्चा काढतील.

असो... वर्षाच्या सुरुवातीला अशा विलक्षण व्यक्तीला भेटल्याने एक नवीन ऊर्जा मिळाली. अशा ह्या 'कमाल' कमला आज्जींना आणि सर्व घाटे कुटुंबाला मानाचा मुजरा.

**






# बाईचा न दिसणारा संसार 'कॅलेंडर'

**सौ. लीना मुळये,** पुणे, मो. ९८२३०५००३८

आईनं रबरबॅन्डमध्ये रोल केलेलं कॅलेंडर कपाटातून बाहेर काढलं.. देवासमोर ठेऊन त्याला हळद कुंकू वाहत नमस्कार केला आणि दरवर्षीप्रमाणे ते फ्रिजजवळच्या भिंतीवर लटकवलं. आई दरवर्षी हे असं करते. मनात प्रश्न आला, काय आहे या साध्या बारा कागदांमध्ये ? म्हणून गेल्या वर्षीचं कॅलेंडर चाळत बसलो.

आईनं गॅस सिलेंडर लावलेली तारीख, बाबांच्या पगाराची तारीख, ताईची पाळी, किराणा भरल्याची तारीख व पैसे, दादाची परीक्षा, बचत गटात पैसे भरलेली तारीख, भिशी, दूध, पेपर व लाईट बिल भरल्याची तारीख, ईएमआयची तारीख, घरकाम करणाऱ्या ताईंचे खाडे यासारख्या बऱ्याच गोष्टींच्या नोंदी होत्या या कॅलेंडरमध्ये. अगदी मावशीच्या मुलाच्या लग्नतारखेपर्यंत.

डिजीटल कॅलेक्युलेटर जरी आकडेमोड करत असलं तरी महिनाभराचं आर्थिक नियोजन याच कागदी कॅलेंडरवर उमटत असतं. गरोदर महिलेच्या चेकींगची तारीख, नंतर तिच्या बाळंतपणासाठी हॉस्पिटलमध्ये नाव नोंदवल्याची तारीख ते अगदी बाळंतीण झाल्याचा दिवसही या कॅलेंडरमध्ये लिहून ठेवला जातो.

दहावी-बारावी बोर्डाचं टाईमटेबल शाळेतून मिळाल्यावर ते घरी आल्या आल्या या कॅलेंडरवर नोंदवण्याची आमच्यात प्रथा असे. अगदी शाळेत दांडी ज्या दिवशी मारली ती तारीख ते लायब्ररीतून घेतलेलं पुस्तक परत करण्याची तारीख याची नोंद आवर्जुन या कॅलेंडरवर व्हायची. सहकुटूंब बाहेर फिरायला जायचं म्हटलं तरी बिचाऱ्या या कॅलेंडरला एक तास चर्चा ऐकावी लागे.

काही घरांमध्ये आजी आजोबांच्या औषधाच्या वेळाही कॅलेंडरवर पाहायला मिळतात. गंमत म्हणजे नवं कॅलेंडर आल्यावर घरातल्यांचे वाढदिवस कोणत्या वारी आलेत, हे पाहण्याचा एक जणू इव्हेंटच असतो. श्रावण, मार्गशीर्षातले उपवास यांचं एक वेगळंच स्थान या कॅलेंडरवर असतं. का कुणास ठाऊक पण संकष्टी चतुर्थी, आषाढी एकादशी, गणेशोत्सव, रक्षाबंधन, नवरात्रौत्सव, दसरा, दिवाळी, होळी, संक्रांत यासारखे दिवस व सण कॅलेंडरमध्ये एकदा पाहूनही मन भरत नाही, ते पुन्हा पुन्हा पाहण्यात एक वेगळंच समाधान वाटतं.

हातात स्मार्टफोन, एक चांगली डायरी घरी असूनही गृहिणी अशा कॅलेंडरवर का लिहीत असतील बरं.. कॅलेंडरचं निरीक्षण केल्यावर उत्तर मिळतं. डोळ्यांसमोर राहणारं शाश्वत असतं म्हणतात, तसंच काही गोष्टी परंपरागत आहेत. गृहिणी घरात ज्या ठिकाणी जास्त असते त्या स्वयंपाकगृहातच अधिककरून हे कॅलेंडर लावलं जातं. याच कॅलेंडरकडं पाहत एककीडे बाईच्या मनात आठवड्याभराचं सारीपाट मांडणं सुरु असतं आणि दुसरीकडे तितकाच चोख स्वयंपाक सुरु असतो. या दोन्हीमध्ये गल्लत मुळीच होत नाही.

या कॅलेंडरकडे पाहिल्यावर असं वाटतं घरातल्या प्रत्येकाच्या सुख-दुःखाची, चांगल्या-वाईट परिस्थितीची नोंद घेण्याची जबाबदारीच जणू या कॅलेंडरनं आपल्याकडे घेतलीय. कदाचित काही महिलांना या कॅलेंडरकडे पाहिल्यावर काहीसा आधारही वाटत असेल... इवल्याशा हुकवर वर्षभर लटकणारं हे कॅलेंडर पाहिल्यावर कदाचित अनेकांना बळही मिळत असेल.

इतक्यात आतून आईचा आवाज आला, कॅलेंडर टाकून नको रे देऊ ते... इतक्यात नसतं टाकायचं..' मला हसू आलं... पण खरं सांगू.. ज्या कॅलेंडरवर वर्षभराच्या सुख-दुःखाच्या, प्रत्येक घटनेच्या नोंदी झाल्या त्या कॅलेंडरविषयी आईच्या मनात हा जिव्हाळा निर्माण होणं स्वाभाविक आहे.

२०20 चं कॅलेंडर पुन्हा रोल करून त्याला रबरबॅन्ड लावलं. त्यावेळी जाणीव झाली आपल्या हातात आहेत, ते फक्त साधे बारा कागद नव्हे तर, बाईचा न दिसणारा संसार आहे. **


# निष्प्राण देह पडला श्रमही निमाले : अनंत गं. हिर्लेकर (तात्याकाका)

**श्री. श्रीरंग श्री. हिर्लेकर,** अमरावती, मो. ९४२२१११८९३

शुक्रवार, दि. ६-११-२०20 दुपारी २ च्या सुमारास मला डॉ. विनय करमरकरांचा फोन आला की काकांवर घरी उपचार करणे कठीण आहे. त्वरीत हॉस्पिटलला घेऊन जा. हे कळवायला मी लगेच गेलो तोवर अनंतकाका अनंताच्या यात्रेला निघूनही गेले होते.

तसे ते निमित्तमात्र आजारी पडून हॉस्पिटलमध्ये भरती होऊन नुकतेच ४-५ दिवसांपूर्वी परतही आले होते. शीर्यते तत् शरीरम् या नैसर्गिक नियमापलिकडे किंवा किरकोळ दुखणी सोडली तर त्यांना म्हणावा तसा आजार गेल्या ९७ वर्षात नव्हता. त्यांची जन्म तारीखही लक्षात राहण्यासारखी - आर्थिक वर्षाची शेवटची म्हणजे ३१ मार्च १९२३. रत्नागिरी जिल्ह्यातील नाधवडे गावचा जन्म. पुढे सुमारे १९४० च्या मागेपुढे अमरावतीला माझे आजोबा प्राणाचार्य पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकरांकडे शिक्षणानिमित्त आले. तात्याकाका हे तसे म्हणावयाचे तर नात्याने माझे चुलतकाका. मात्र सुदैवाने आमच्या घरी सख्खेचुलत हा प्रकार अजुनतरी नाही, पुढे भारतीय रेल्वेत नोकरीला लागून मुंबई आणि बदलीप्रमाणे अनेक ठिकाणी फिरुन निवृत्तीनंतर पुन्हा अमरावतीला माझे चुलतभाऊ वैद्य श्रीवास हिर्लेकर यांच्या घरी शेवटपर्यंत स्थायी स्वरुपात राहिले.

स्थायी स्वरुपात अशासाठी म्हटले की ते सतत भ्रमंतीवर असावयाचे. कुटुंबातील आणि नातेसंबंधातील ज्याच्या घरी कौटुंबिक अडचणी, तेथे त्यांना हक्काने निमंत्रण यायचे आणि लगेच त्यांच्या घरी काका मदतीसाठी अनेकदिवस थांबून सर्वप्रकारची तन-मन आणि धन या तिनही प्रकारे मदत करून प्रसंग निभवायचे. हिर्लेकर कुटुंबियांना आणि माहेरवाशिणींना त्यांचा आधार वाटणे स्वाभाविक पण बाहेरुन आलेल्या सुनांनाही ते त्यांच्या माहेरचेच वाटायचे. घरगुती - अगदी स्वयंपाकघरातील कामातही त्यांची मदत व्हायची. आयुर्वेदाची उत्तम माहिती, वनस्पतींची



ओळख, त्यामुळे त्याचे योग्य उपचारही ते सुचवीत. अनेक वैदीक ऋचा, सूक्ते आणि स्तोत्रे त्यांना अस्खलीत आणि सस्वर माहित होते. त्यांचेही पठन विशेष निमित्ताने करत असत.

श्री म्हणजे भगवंताचे षडैश्वर्य, यानुसार श्रीमतां शुचिनां गेहे या वर्णनाप्रमाणे त्यांचा जन्म अत्यंत सुसंस्कारीत आणि विद्वान घराण्यात झाला. विद्वत्ता आणि बहुश्रुतता यांचे बाळकडूच त्यांना मिळाले होते आणि पुढे सातत्याने आणि स्वतःच्या वागणुकीने त्यांनी ते जोपासले व वाढवले. नात्यातच काय पण बाहेरही त्यांच्याविषयी परकेपणा कोणाला वाटला नाही किंवा ते कोणाला आणि कोणी त्यांना कधी कंटाळले नाही. यस्मान्नो द्विजते लोको लोकान्नो द्विजते च यः आणि अद्वेष्टा सर्व भूतानं मैत्र करूण एव च ही दोनही वचने माझ्याप्रमाणेच अनेकांनी त्यांच्या बाबतीत प्रत्यक्ष अनुभवली आहे.

सातत्याने लेखन आणि वाचन ते नित्य करीत. विशिष्ट विषयांचे बंधनही नाही, डायरीमध्ये कितीतरी अप्रसिद्ध लेखन करून ठेवले आहे, वृत्तपत्रात अनेक प्रासंगिक लेख ते लिहित. वयाच्या ९५ नंतर त्यांनी सांख्यदर्शन हे पुस्तक तसेच श्री देवदत्त पटनाईकांच्या दूरदर्शनवरील इंग्रजी वक्तव्याचे मराठी भाषांतर करून ते देवलोक या नावे प्रसिद्धही केले. त्यांच्याकडे गेले की असंख्य विषयांवर ते बोलत, नविन काही लिहिलेले वाचून दाखवित. ठामपणे स्वतःची मते मांडत, अनेक संदर्भ देत, आपलेही ऐकून घेत आणि त्यावर अभ्यासपूर्ण चर्चा करत. कार्यक्रमात उभे राहून व्याख्यान देत, आताच्या मार्च महिन्यातील आयुर्वेद

महाविद्यालयाच्या पुरस्कार वितरणातही ते मार्गदर्शनपर काही वेळ बोलले.

आयुष्यभर ब्रह्मचारी राहिले, इतरांचा संसार तोच त्यांचा. प्राप्तव्य असे काही उरलेच नव्हते. लॉकडाऊनमुळे त्यांच्या सार्वजनिक आयुष्याला आणि भेटीगाठींना बंधने आलीत तेवढेच, कदाचित हे असह्य झाले असावे म्हणून की काय ते हल्ली लागले नेत्र पैलतीरी अशा अवस्थेत कधी बसून राहात. शेवटी कविवर्य बोरकर म्हणतात तसेच त्यांच्या जीवनाचे सार्थक झाले.

देखणी ती जीवने जी
तृप्तीची तीर्थोदके ।
चांदणे ज्यातून फाके शुभ्र पाऱ्यासारखे ।
देखणा देहान्त तो, जो
सागरी सूर्यास्तसा ।
अग्नीचा पेरून जातो
रात्रगर्भी वारसा ।।

देहदानाचा त्यांचा संकल्प मात्र लॉकडाऊनच्या बंधनामुळे कमी कर्मचारीसंख्या आणि अल्प व्यवस्था अशी असमर्थता हॉस्पिटलने व्यक्त केल्यामुळे अपुरा राहिला.

**

माणसाच्या विचारांमध्ये '**विवेक**' असला, स्वभावामध्ये '**विनय**' असला आणि संभाषणामध्ये '**विनम्रता**' असली की, तो माणूस जीवनातील कोणत्याही कठीण प्रसंगावर '**विजय**' मिळवू शकतो.

**Vijay Diwakar Dhavle**
MFA



CONCEPT PRINTS
THE DESIGN STUDIO

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN

- Pharmaceutical Product promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594

Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur- 440032

Plot 118, New Dnyneshwar Nagar, Manewada Road, Nagpur - 440027

# गणपतीची ३२ रूपे

**संग्राहक - श्री. सुहास खानवलकर,** पुणे, मो. ९४०३९२८५२०

भक्तीविषयक ग्रथांमध्ये गणपतीच्या ३२ रुपांचा उल्लेख आढळतो. सर्वप्रथम ह्या रुपांचा उल्लेख मुद्‌गल पुराणामध्ये आढळतो. ह्या रुपांची सविस्तर माहिती १० व्या शतकात लिहिलेल्या श्रीतत्वनिधी ह्या कन्नड ग्रंथातील शिवनिधी ह्या अध्यायामध्ये आहे. ह्या ३२ रुपांमधली पहिली १६ रुपे ''षोडश गणपती'' ह्या नावांनी प्रसिद्ध आहेत. ह्या ३२ रुपांची संक्षिप्त माहिती आम्ही इथे देत आहोत.

१) **बाळ गणपती :** लहान बांधा असलेलं, लहान मुलासारखं हे रुप आहे. म्हणून ह्याला बाळ गणपती असं नाव आहे. हे रुप चतुर्भुज आहे. चेहरा हत्तीचा आहे. रंग सूर्योदयाच्या वेळेचा लालसर आहे. हातांमध्ये केळी, आंबा, फणस, ऊसाचा तुकडा आणि सोंडेमध्ये मोदक.

२) **तरुण गणपती :** हे गणपतीचं यौवन रुप आहे. हे रुप अष्टभुज आहे. चेहरा हत्तीचा. हातांमध्ये पाश, अंकुश, मोदक, कवठ, जांभूळ, तुटलेला दात, ऊसाचा तुकडा, भाताचा तुरा. रंग दुपारच्या सूर्याप्रमाणे लाल.

३) **भक्ती गणपती :** भक्तांचा गणपती म्हणून ह्याला भक्ती गणपती असे नाव आहे. रंग शरद ऋतूच्या पांढऱ्या ढगासारखा. चतुर्भुज. चेहरा हत्तीचा. हातांमध्ये खोबरं, आंबा, केळी आणि खिरीचं भांडं.

४) **वीर गणपती :** हातांमध्ये वेताची छडी, धनुष्य, बाण, भाला, चक्र, तलवार, ढाल, चाबूक, गदा, अंकुश, नाग, त्रिशूल, कुदळ, इ. १६ असत्र १६ हातांमध्ये. रंग लालसर, चेहरा रागीट. हातात वेगवेगळ्या प्रकारच्या तलवारी.

५) **शक्ती गणपती :** रंग शेंदुरी. हिरव्या रंगाच्या देवीला आलिंगन देत आहे असं हे रुप आहे. एक हाच अभय मुद्रा दाखवत आहे. उरलेल्या हातांत पाश, अंकुश आणि फुलांचा हार.



६) **द्विज गणपती :** चार हात आणि चार मुखं असलेलं हे रुप आहे. हातांमध्ये पुस्तक, अक्षमाला, दंड आणि कमंडलु आहे. दोन हातांमध्ये विजेसारखे चमकणारे कडे. रंग चंद्रासारखा पांढरा.

७) **सिद्धी गणपती :** चार हात आणि सोंड. चार हातांमध्ये आंबा, फुलांचा गुच्छ, ऊसाचा तुकडा आणि परशु. ह्या गणपतीच्या रुपाला तिळाचा लाडू खूप आवडतो. रंग सोन्यासारखा चमकणारा आणि हिरवी छटा.

८) **उदिच्छष्ट गणपती :** ह्या रुपाला सहा हात आहेत. हातांमध्ये डाळिंब, वीणा, भाताचा तुरा, अक्षमाला, नीलकमल, गुंजेची बोरं. रंग निळा.

९) **विघ्न गणपती :** हे अष्टभुज रुप आहे. हातांमध्ये शंख, ऊसाचा तुकडा, धनुष्य, पुष्पबाण, कुऱ्हाड, पाश, चक्र, फुलांचा गुच्छ, बाण. रंग सोन्याचा. भरपूर अलंकार.

१०) **क्षिप्र गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. नावाप्रमाणे त्वरीत पावणार (क्षिप्र). रंग लालसर. दिसायला सुंदर. हातांमध्ये अंकुश, पाश, दंत, कर्पग कुडी, सोंडेच्या टोकावर रत्नकलश.

११) **हेरंब गणपती :** हे पाच मुखांचं आणि दशमुख असं रुप आहे. एक हात अभय मुद्रा आणि एक हात वरद मुद्रा. उरलेल्या हातांमध्ये पाश, दंत, अक्षमाला, माळ, परशु, चाबूक, मोदक, फळ. रंग गडद हिरवा. वाहन – सिंह

१२) **लक्ष्मी गणपती :** हे अष्टभुज रुप आहे. हातांमध्ये पोपट, डाळिंब, कलश, अंकुश, पाश, कर्पग

कुडी, खड्ग, वरद हस्त. रंग अमृताच्या प्रवाहासारखा पांढरा. बाजूला दोन देवी - सिद्धी-सिद्धी.

**१३) महागणपती :** हे दशभुज रुप आहे. हातांमध्ये - डाळिंब, गदा, ऊस, धनुष्य, चक्र, कमळ, पाश, नीलकमळ, भाताचा तुरा, दंत. सोंडेच्या टोकावर रत्नकलश. रंग सकाळचा लाल रंगाचा सूर्यकिरण. तीन डोळे. डोक्यावरती चंद्रकला. मांडीवर देवी आणि देवीच्या हातात कमळ. एकमेकांला आलिंगन दिले आहे.

**१४) विजय गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. हातांमध्ये पाश, अंकुश, दंत, आंबा, मूषक वाहन. रंग लालसर

**१५) नृत्य गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. बोटामध्ये अंगठ्या. हातांमध्ये पाश, अंकुश, कुऱ्हाड, दंत वगैरे. रंग सोन्याचा. कल्पवृक्षाच्या खाली विराजमान.

**१६) ऊर्ध्व गणपती :** हे अष्टभुज रुप आहे. हातांमध्ये निळ्या रंगाचे फुल, भाताचा तुरा, कमळ, कुऱ्हाड, ऊसाचा तुकडा, धनुष्य, बाण, दंत आणि शेवटच्या हाताने देवीना आलिंगन दिले आहे. रंग चमकणारा सोनेरी आणि हिरवी छटा.

**१७) एकाक्षर गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. रंग लाल. लाल रंगाचं सोवळं नेसले आहे. लाल रंगाचा फुलांचा हार. कपाळावर चंद्रकोर. त्रिनेत्र. हाताची लांबी कमी. पाय लहान. हातांमध्ये डाळिंब, पाश, अंकुश आणि वरदहस्त. हत्तीचा चेहरा. पद्मासन घालून बसेलेल आहेत. वाहन मूषक.

**१८) वर गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. रंग लाल. त्रिनेत्र. हातांमध्ये पाश, अंकुश, मधाने भरलेले पात्र, मानवी कवटीचा खालचा भाग, डोक्यावर चंद्रकोर

**१९) त्र्याक्षर गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. कान हलतात (चामरासारखे). रंग सोन्यासारखा. हातांमध्ये पाश, अंकुश, दंत, आंबा. सोंडेच्या टोकाला मोदक.

**२०) क्षिप्रप्रसाद गणपती :** हे षडभुज रुप आहे. त्वरित प्रसाद देणारा. हातांमध्ये पाश, अंकुश, दंत, कल्पकता, कमळ, लिंबू धारण केले आहे. अलंकार घातलेले आहेत. पोट मोठे आहे. वेगळ्या प्रकारची गदा पण धारण केली आहे.

**२१) हरिद्रा गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. रंग पिवळा. हातांमध्ये पाश, अंकुश, दंत, मोदक, भक्तांना अभय देणारे.

**२२) एकदंत गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. पोट मोठे (पेटाऱ्यासारखे), रंग निळा. हातांमध्ये कुऱ्हाड, अक्षमाला, लाडू, दंत

**२३) सृष्टी गणपती :** मूषकावर आरूढ झालंल चतुर्भुज रुप आहे. रंग लाल. हातामध्ये पाश, अंकुश, दंत, आंबा.

**२४) उदंड गणपती :** हे बारा हातांचं रुप आहे. रंग लाल. हातांमध्ये नीलकमळ, डाळिंब, गदा, दंत, ऊसाचा तुकडा, धनुष्य, रत्नकलश, पाश, अंकुश, भाताचा तुरा, हार (रत्नहार), कमंडलू आणि शंख. हिरव्या रंगाची देवी डाव्या मांडीवर बसली आहे. तिच्या हातामध्ये कमळ आहे. तिला आलिंगन दिले आहे.

**२५) ऋणमोचन गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. हातांमध्ये पाश, अंकुश, दंत, जांभूळ. रंग स्फटिकासारखा पांढरा. लाल रंगाचं सोवळं.

**२६) धुंडी गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. हातांमध्ये अक्षमाला, कुऱ्हाड, रत्नकलश, दंत, रंग लाल.

**२७) द्विमुख गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. हातांमध्ये दंत, पाश, अंकुश, रत्नकलश, रंग फिका निळा, रत्नाचा मुकुट धारण केला आहे. लाल रंगाचं सोवळं, दोन मुखं आहेत.

२८) **त्रिमुख गणपती :** ह्या रुपाला तीन मुखं आहेत. उजव्या हातांमध्ये अंकुश, अक्षमाला, वरदहस्त. डाव्या बाजूच्या हातांमध्ये पाश, अमृताचा कलश, अभयहस्त, कमळाच्या आसनावर बसलेल आहेत. रंग लाल.

२९) **सिंह गणपती :** हे अष्टभुज रुप आहे. उजव्या बाजूच्या हातांमध्ये वीणा, कल्पवृक्षलता, चक्र, वरदहस्त. डाव्या बाजूच्या हातांमध्ये कमळ, रत्नकलश, फुलांचा गुच्छ, अभयहस्त. रंग पांढरा. वाहन सिंह.

३०) **योग गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. योगमुद्रा आसन. रंग कोवळ्या सूर्याच्या किरणासारखा. वस्त्र इंद्रनील रंगाचं वस्त्र धारण केलं आहे. हातांमध्ये पाश, अक्षमाला, योगदंड, ऊस.

३१) **दुर्गा गणपती :** हे अष्टभुज रुप आहे. रंग सोन्याला तापवल्यावर जो रंग येतो तो. स्थूल शरीर. उजव्या बाजूच्या हातांमध्ये अंकुश, बाण, अक्षमाला, दंत. डाव्या बाजूच्या हातांमध्ये पाश, धनुष्य, वेल, जांभूळ. लाल रंगाचं वस्त्र.

३२) **संकटहर गणपती :** हे चतुर्भुज रुप आहे. रंग सूर्याच्या कोवळ्या किरणांसारखा. डाव्या बाजूला हिरवा रंग असलेली देवी. जिच्या हातात निळ्या रंगाचे फुल आहे. ती डाव्या मांडीवर बसली आहे. डाव्या बाजूच्या हातांमध्ये पाश, खिरीची वाटी. उजव्या बाजूच्या हातांमध्ये अंकुश, वरदमुद्रा. लाल कमळावरती उभे आहेत. निळ्या रंगाचे वस्त्र धारण केले आहे.

**

वयाने कोणी कितीही
लहान मोठा असू देत
वास्तवात तोच मोठा असतो,
ज्याच्या मनात सर्वांसाठी
प्रेम, स्नेह व आदर असतो... !

## काळ बदलला !!!

काय म्हणता काळ बदलला ?
पूर्वीचा काळ सुखाचा
आता नाही कोण कुणाचा
तोच प्रवास तोच रस्ता
वीट आलाय या जीवनाचा ।

मान्य आहे इंधन महागलंय, प्रदूषण वाढलंय
पण कधी पहाटे लवकर उठून
''धनःश्याम सुंदरा' ऐकलंय ?
ते राहू द्या हो, सूर्योदयाचे मनोहर रुप
शेवटचं केव्हा पाहिलंय ?

मान्य आहे, तुम्ही खूप धावपळ करता,
एकाचवेळी अनेक ठिकाणी असता,
पण पाहिलाय का कधी पौर्णिमेचा चंद्र
कोजागिरी वगळता ?
तृण मखमलीवर आकाश पांघरून
मोजल्यात कधी चांदण्या रात्र सरता ?

मान्य आहे पाऊलवाटांचे हमरस्ते झालेत
अन् मनाचे कप्पे मात्र अरुंद झालेत
जरी असाल तरी तुम्ही इंटरनेटवर हजारो मित्र
पाठवतही असाल ढिगांनी ई-मेल्स अन् चित्र
पण कुणाला पाठवलंय का कधी एखादे
अडीच रुपयाचे आंतरदेशीय पत्र ?
अन् लुटलाय का कधी पोस्टमन कडून
शुभेच्छा तार स्वीकारल्याचा आनंद ?

मान्य आहे, जीवनमान बदललंय
पालटलय साराच सूर नूर
आम्हालाही पडते आजकाल
डिजे-पार्ट्यांची भूल
पण ऐकलाय कां हो कधी ?
रेडिओवर अकराचा 'बेला के फूल ?'
मला नाही असं काय झालंय
की ज्यानं आपलं अवघं विश्वच बदललंय
सूर्य नाही बदलला, चंद्रही नाही बदलला.
काळ आहे तिथेच आहे, तोही नाही बदलला.
तुमचा आमचा पाहण्याचा नजरीयाच बदलला.

**- अनामिक**

# रत्नागिरीतील अठरा हातांचा गणपती

**सौ. विजया फणसळकर,** सातारा, मो. ९७६६२०४५७६

भारतातील एकमेव मूर्ती : रत्नागिरीतील प्रसिद्ध धार्मिक स्थळांपैकी एक असलेले स्थळ म्हणची वरची आळी येथील 'अठरा हाताचा गणपती !'

रत्नागिरीतील या मंदिराची ख्याती दूरवर आहे. हे मंदिर जोशी कुटुंबीयांचे खासगी मालकीचे आहे. मात्र असे असले तरी मंदिर दर्शनासाठी सर्वांना खुले आहे. दर संकष्टीला, अंगारकी संकष्टीला तसेच दर मंगळवारी गणेशभक्त बहुसंख्येने या गणेशाच्या दर्शनाला येत असतात. या मंदिरातील गणपतीच्या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे या मूर्तीला अठरा हात आहेत. यावरून 'अठरा हाताचा गणपती' असे मंदिराचा नामोल्लेख केला जातो.

वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे संपूर्ण भारतात अठरा हात असेलली श्री गणेशाची ही एकमेव मूर्ती आहे. तसेच हे एकमेव मंदिर आहे. रुद्रयामल पुराणातील मंत्र दैवत म्हणून हा गणेश ओळखला जातो. अशी माहिती धर्मदास, कीर्तनकार नाना जोशी यांनी दिली.

विनायकराव कृष्ण जोशी यांनी १९६७ साली या मंदिराची स्थापना केली. आजच्या घडीला या मंदिराला ५२ वर्षे पूर्ण होत आहेत. याबाबत आख्यायिका अशी सांगितली जाते की, विनायकराव जोशी हे राजापूरच्या पोस्ट कार्यालयात पोस्टमास्तर म्हणून सेवेत असताना त्यांना इंदूर येथील अच्युतानंद तीर्थस्वामी आपणाहून घरी आले आणि या गणपतीची उपासना करायला सांगितली. काही वर्षांनी विनायकराव जोशी यांची नोकरी सुटल्याने ते महाराजांना भेटायला गेले. तेव्हा ते म्हणाले की, आता या गणपतीची पूर्ण उपासना कर, संपूर्ण भारतभर तुझी कीर्ती होईल.

अच्युतानंद तीर्थस्वामींचे भारतभर १५०० हून अधिक शिष्य होते, त्यापैकी विनायकरावांनाच त्यांनी गणेश उपासना करायला सांगितली आणि इतरांना देवीची उपासना दिली. त्यानंतर विनायकरावांनी गणपतीपुळे येथे जाऊन २१ दिवसांची कठोर उपासना केली. तेव्हा देवाने त्यांना साक्षात द्रष्टांत देऊन मंदिर बांधण्याचा आदेश दिला. त्यानंतर विनायकारावांनी हे मंदिर बांधल्याची आख्यायिका आहे. मंदिर खासगी असल्याने मंदिरासाठी कोणतीही देणगी स्वीकारली जात नाही.



मंदिर अत्यंत साधे कोंकणी स्वरुपाचे आहे. गाभारा छोटेखानी आहे. त्यामध्ये अठरा हाताच्या गणपतीची पुर्वाभूमुखी प्रसन्न मूर्ती आहे. या मंदिराच्या स्थानाची प्रसन्नता भक्तांना ऊर्जा देऊन जाते. या मूर्तीचे वेगळेपण म्हणजे या श्रीगणेशाला १८ हात आहेत. त्याच्या प्रत्येक हातात १८ प्रकारची आयुधे आहेत. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा ते पंचमी असा देवाचा वार्षिक उत्सव असतो. त्यावेळेला या मंदिरात सर्व धार्मिक विधी केले जातात.

मार्गशीर्ष शु. चतुर्थीला दुपारी १२.३९ वा. जन्मोत्सव साजरा केला जातो. यावेळी देवाला सहस्त्र मोदक, सहस्त्र दुर्वा, सहस्त्र शमीपत्रे, सहस्त्र तीळ, सहस्त्र तांदूळ वाहिले जातात. पंचमीच्या दिवशी तो मोदक प्रसाद म्हणून गणेशभक्तांना वाटण्यात येतो. हा गणेश आपल्या मनोकामना पूर्ण करतो अशी गणेशभक्तांची श्रद्धा आहे. या मंदिरात दर मंगळवारी, संकष्टी चतुर्थी, अंगारकी संकष्टीला अठरा हाताच्या गणपतीचे भाविक बहुसंख्येने दर्शन घेतात.

अठरा हाताच्या गणपतीचे दर्शन कोल्हापूर पीठाचे शंकराचार्य, सिद्धयोगी, प्रख्यात कीर्तनकार, प्रवचनकार आदींनी घेतले आहे. या मंदिराची सर्व व्यवस्था नाना जोशी आणि त्यांचे बंधू, कुटुंबीय पाहतात.

**

# खसखस

संग्राहक- **सौ. शुभदा गुर्जर,** पुणे
मो. ९३९२९००४५

**खसखस म्हणजे नेमकं काय ? खसखस कुठून मिळते ?**

अफूच्या बोंडातील बी म्हणजे आपण वापरतो ती खसखस. कित्येक जणांना ही गोष्ट माहित नसेल. दिवाळीतील अनारसे बनवताना त्यावर खसखस वापरली जाते तसेच बाळंतीणीला खसखसची लापशी खाऊ घालतात, इथपर्यंतच खसखस आणि आपली ओळख.

**खसखस कशी मिळवतात ? त्याआधी बघूया अफूबद्दल थोडी माहिती.**

अफूच्या कच्च्या फळांना चिरा पाडून चिरा पाडल्यावर फळातून रस पाझरतो; वाळून घट्ट झालेला रस म्हणजे अफू. मादक पदार्थ म्हणून अफूची लागवड प्राचीन काळापासून होत आली आहे. भारतामध्ये अफूच्या झाडाच्या लागवडीवर, उत्पादनावर, औषधी घटकांच्या निर्मितीवर कायद्याने नियंत्रण आहे. अफूचे शुद्धीकरण, प्रत, विक्री, निर्यात, अल्कलॉइडांची निर्मिती इत्यादी सर्व बाबी सर्वस्वी भारत सरकारच्या अधिपत्याखाली होतात. भारत हा जगातील एकमेव मान्यता प्राप्त अफू निर्माण करणारा देश आहे.

'पॅव्हर सॉम्निफेरम' असं शास्त्रीय नाव असलेल्या अफूच्या बिया म्हणजे खसखस. भारतीय खसखस ही प्रामुख्याने पांढरी असते तर युरोपियन खसखस ही निळी किंवा काळी असते. इंग्रजीत 'पॉपी सीडस्', हिंदीत 'खसखस', कन्नडमध्ये 'घस घस' तर बंगालीत 'पोस्तो' असं म्हटलं जातं. खसखशीचं कवच खूप कठीण असतं. त्यामुळे ती दुधात किंवा पाण्यात काही तास भिजवून नंतर वाटली जाते. त्यानंतर कढईत कोरडी भाजून तिची पूड केली जाते. पाण्याबरोबर पेस्ट केली जाते. खसखशीत काही प्रमाणात 'ई' जीवनसत्त्व, कॅल्शियम, फॉस्फरस, लोह, आयोडिन, मॅगनीज, मॅग्नेशियम, तांबे, पोटॅशियम आणि जस्त यांचं प्रमाण असतं.

**खसखसचे औषधी गुणधर्म आणि आरोग्यसाठीचे फायदे :**

खसखशीच्या आवरणातील उपलब्ध तंतूमुळे पोट साफ होण्यास मदत होते तसेच हा तंतू कोलॅस्टरॉलमुळे निर्माण होणारी रसायनांमध्ये बंध निर्माण करतो. त्यामुळे विघातक कोलॅस्टरॉल कमी होण्यास मदत होते आणि परिणामी हृदयरोगाचा धोका कमी होतो.

* खसखस वाटून अंगाला लावल्यास त्वचा मृदू होते.
* दोन चमचे खसखस रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी खाल्ल्याने बुद्धी तल्लख होते.
* हाडांच्या मजबुतीसाठी आणि योग्य वाढीसाठी खसखस खाणे फायदेशीर ठरते.
* खसखसच्या नियमित सेवनाने आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढते.
* निद्रानाशावरही खसखशीचा काढा घेतल्यास उपयुक्त ठरतो. खूप जुलाब होत असल्यास खसखशीच्या बिया वाटून त्याची लापशी किंचित जायफळ व सुंठ चूर्ण मिसळून घ्यावी.
* खूप कृश झालेल्या व्यक्तीने हिवाळ्यात खसखस लापशी जरूर घ्यावी. प्रकृती सुधारते, झोप येत नसल्यास साखर किंवा मधाबरोबर खसखशीचा काढा झोपताना घ्यावा.
* हाय ब्लडप्रेशर आणि रक्ताल्पता दुधातून खसखस घेतल्याने दूर होते.
* श्वसनासंबंधी विकारांवर दुधातून खसखस घेतल्यास त्वरित आराम पडतो.

(टीप : गंभीर आजारपणात कृपया डॉक्टरांच्या सल्ल्यानेच खसखसचा वापर करावा.)

**

# हा बदल नक्की केव्हा झाला ?

श्री. संदीप कळके, ठाणे, मो. ९८२११४४६११

काही काळापूर्वी नोकरी करणारा मुलगा पगार निमूटपणे वडिलांच्या हातात देत होता. मग वडील त्यातून घरातला काही खर्च करायचे, थोडी बचत केली जायची आणि मुलाला येण्या-जाण्याच्या तिकीटापुरते आणि दिवसाला फारतर एक चहा पिता येईल इतकेच पैसे दिले जात होते आणि आता मुलाला पगार किती मिळतो.. हे विचारायला आई-वडिल कचरतात ! मुलगा त्या पैशाचे काय करतो ? हे विचारायची हिम्मत किंवा इच्छा आई-वडिलांकडे असतेच असं नाही. हा बदल केव्हा झाला ?

कॉलेजमध्ये जाताना साडीऐवजी पंजाबी ड्रेस घालायला मिळतो, याचा आनंद मानणारी मुलगी... आता तिच्या मुलीला हाफपॅन्टमध्ये खुशाल फिरताना बघते. मनातल्या मनात चरफडते.. पण स्पष्टपणे मुलीला अंगभर कपडे घाल असे म्हणायची हिंमत काही करत नाही !

**हा बदल केव्हा झाला ?**

वयात आलेली मुलगी संध्याकाळच्या आत घरात असायची. घरकामात मदत करायची. आता एकदा स्वयंपाकघरात येऊन खायला काय आहे.. ते बघते आणि स्वतःच्या खोलीत जाऊन परस्पर ऑर्डरवर खाणं मागवते! हा बदल केव्हा झाला ?

फोटो पाहून पसंत पडल्यावर एक-दोन वेळा कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये लग्नाअगोदर भेटणे म्हणजेच पुढारलेपण मानले जाणारे आई-वडिल सहजतेने मुलांचे 'लिव-इन' रिलेशनशिप स्वीकारतात !

**हा बदल केव्हा झाला ?**

वर्षातून एकदा होळीच्या वेळी मोठ्या लोकांपासून लपून भांग पिण्याचा कार्यक्रम ठरवणारी आता प्रौढ झालेली माणसं घरातल्या तरुण मुलांपुढे सहज ग्लास भरू लागली...



**हा बदल कधी झाला ?**

नातवंडांना जवळ घेणारी.. नातीच्या केसांना तेल लावून देणारी, गोष्टी सांगणारी आजी आता सकाळी योगा क्लास नाही, तर लाप्टर क्लासला जाते आणि नातवंडांशी टीव्हीच्या रिमोटसाठी भांडते आणि आजोबा! त्यांची तर वेगळीच दुनिया, ते फेसबुक आणि व्हॉट्सअप  शिवाय जगू शकत नाहीत.

**हा बदल केव्हा झाला ?**

घरातल्या कोणाशी बोलत नाहीत अशांना कौन्सिलर जवळचा वाटतो. त्याला पैसे देऊन त्याचा सल्ला मानतात, पण स्वतःच्या जन्मदात्यांवर विश्वास ठेवायला तयार नसतात. तोच प्रकार पैशाच्या व्यवहाराबद्दल ! नवरा-बायको दोघेही कमावतात, पण कुठे खर्च झाले, किती गुंतवले गेले ? कुठे गुंतवले गेले ? ते फक्त सीएला माहित असते. मुलीच्या संसारातले सगळे लहानसहान तपशील जाणून घेणारे आई-वडील, मुलगा आणि सुनेच्या बाबतीत मात्र अलिप्त राहतात !

**असं का होतंय ?**

नवऱ्याला अहो म्हणणाऱ्याच्या मुली.. स्वतःच्या नवऱ्याचा येता जाता अपमान करतात, त्याला टोमणे मारतात. सगळ्यांसमोर उणं-दुणं काढतात. अशावेळी

मुलीचे आई-वडील कसनुसं हसतात आणि मुलाचे आई-वडील हतबुद्ध होतात !

**हा बदल कधी झाला ?**

मुलगा-सून वेगळे घर घेतात, पण मुलांच्या आई-वडिलांना शेवटी समजतं ! लग्नात सासरकडून मिळालेले दागिने दोन-तीन वर्षात मोडून दुसरे बनवले जातात.

**असं का होतं ?**

तरुण मुले एक नोकरी सोडतात, दुसरी धरतात. राहत्या गावातून दुसऱ्या गावी जातात. सगळे ठरल्यावर आई-वडिलांना फक्त सांगितले जातं. त्याच्यापेक्षा कमी महत्त्वाच्या गोष्टींमध्ये तर आई-वडिलांना सांगण्याचीही गरज नसते. मित्रांबरोबर ट्रीपला जाणे, ब्रेकअप होणे, सिनेमाला जाणे, पार्टी करणे, स्वतःसाठी नवीन वस्तू, फोन, कपडे वगैरे खरेदी करणे... अशा गोष्टीत आई-वडिलांनी दखल दिलेली आताच्या मुलांना आवडत नाही.

**असं का होतं ?**

नातेवाईकांकडे जाणं, शेजाऱ्यांकडे वेळप्रसंगी जाणं, लग्न-समारंभात सहभागी होणं, कुळाचार पाळणं, देवळात जाण, पूजा करणं... इत्यादी गोष्टींवर आता घरात नाराजी नाही तर भांडणे होतात.

**असं का होतं ?**

मान्य आहे दोन पिढ्यांमध्ये अंतर असतेच, पाचवारी नेसणाऱ्या सुनेबद्दल नऊवारी नेसणाऱ्या सासूने तेव्हाही नाराजी व्यक्त केली होती, पण आता पन्नाशी पार केलेल्या पिढीत आणि त्यांच्या मुलांच्या पिढीत अंतर नाही... दरी निर्माण झालीय असं वाटतं.

**



## बिनधास्त जगा मित्रांनो

एकदा का **चाळिशी** पार केली 'जास्त शिकलेला' आणि 'कमी शिकलेला' दोघेही सारखेच... (कमी शिकलेला कदाचित जास्त पैसे कमावत असेल.)

**पन्नाशी** नंतर 'सुंदर' आणि 'कुरुप' हा भेदभावच नष्ट होतो. दोन्ही सारखेच. (कोण कितीका सुंदर असेना या वयात सुरकुत्या, डोळ्यांभोवतालची काळी वलये लपता लपत नाहीत.)

**साठी** नंतर 'मोठी पोस्ट' आणि 'लहान पोस्ट' असेही काही उरत नाही... दोन्ही सारखेच. (निवृत्तीनंतर तर ऑफिसातला प्युनदेखील साहेबाला बघायचे टाळतोच.)

**सत्तरी** पार केल्यावर 'मोठे घर' आणि 'लहान घर' असा विचारसुद्धा मनात येत नाही. दोन्ही सारखेच. (साधेदुखी बळावून हालचाल करणे मुश्किल झाले की बसण्यापुरती जागा असली तरी पुरे.)

**ऐंशी** नंतर गाठीशी पैसा 'असला' काय किंवा 'नसला' काय... दोन्ही सारखेच. (जरी पैसा खर्च करावासा वाटला तरी स्वतःसाठी कुठे अन् कसा खर्च करावा हा मोठा प्रश्न उरतोच.)

नशीबाने **नव्वदी** पार केली (अभिनंदन) तर 'झोपणे' आणि 'उठणे' यात सुद्धा फरक राहत नाही... दोन्ही सारखेच. (कारण उठून बसल्यावर आता करायेच काय हा गहन प्रश्न उरतोच.

अजून **शंभरी** पार करायची ईच्छा आहे का ?

जीवन साधे-सरळ-सोपे आहे. आनंदाने जगा...!

उगाच नेहमी कुठले तरी गहन कोडे सोडवल्याचा आइन्स्टाइनचा आव आणि भाव आणू नका.

एक लक्षात ठेवा... लांब पल्ल्याच्या शर्यतीत आपण सगळे समानच आहोत. तेव्हा निर्भेळ आनंद लुटा, हसा. स्वतःसाठी काही वेळ तरी जगायला शिका, कारण... जिंदगी ना मिलेगी दोबारा.

संग्राहक - **गणेश गुर्जर**
मो.८१४९९०७७८९

# Surname in Maharashtra.. एक शोध..

(दुनिया में विभिन्न प्रकार के इतने सरनेम महाराष्ट्र के अलावा नहीं नहीं मिलेंगे)

- **Colourful Maharashtrians**
  काळे, गोरे, पांढरे, काळभोर, हिरवे, पिवळे, ढवळे, सावळे
- **Metallic Maharashtrians**
  पितळे, तांबे, लोखंडे, सोनार, चांदेकर, रत्नपारखी, हिरेखण, पूणताँबेकर
- **Facial Maharashtrians**
  केसकर, टकले, डोले, दाते, माने, कानफाडे, नकटे, बोबडे, तोतडे, डांगे, डोळस, डोईफोडे, टाँगे, नखाते.
- **Professional Maharashtrians**
  दिवेकर, वैद्य, वकील, भगत, चिटणीस, दिवाण, भालदार, कुलकर्णी, उद्धव, पारधी, शास्त्री, मुकादम, गोसावी, सुतार, जोशी, गुरु, पंडित, घांगरेकर.
- **Vegetable Maharashtrians**
  आंबेकर, आंब्रे, काकडे, देठे, दुधे, बुधे, केळकर, भाजीखाये, नारळे, मुळे, पिंपळकर, वाले, भेंडे, फुलमाळी, भाजीपाले.
- **Ecological Maharashtrians**
  मांजरेकर, कोल्हे, कावळे, तितरमारे, वाघ, घारपुरे, वाघमारे, लांडगे, गरुड, घारे, किटकुले, उंदीरवाडे, चीतळे, पालकर.
- **Funny Maharashtrians**
  पाद्धे, हगे, भूत, लिडबीडे, वडाभात, पोटभरे, पोटदुखे, पोटपुसे, पोटे, उकिडवे, थूके, चाटे, वाडीभस्मे, रागीट, लेले.
- **Common Maharashtrians**
  मेश्राम, बालपांडे, गेडाम, जोशी, देशपांडे, सहारे, मडावी, देशमुख, बारापातरे, मोहिते, पवार, ठाकरे, ठाकूर, देसाई, सुर्वे, शिंदे.
- **Money Oriented Maharashtrians**
  लाखे, हजारे, सव्वालाखे, पगारे, शंभरकर, हजारे, चिकटे, पन्नासे, फुकटे, बावनकर, तनखीवाले, परीपगार.
- **Loud Maharashtrians**
  आकांत, गोंधळी, केकतपुरे, बोंबले, तावडे
- **Village Maharashtrians**
  झोंकरकर, ओसवाडकर, शेगाँवकर, नागपुरे, पंढरपुरे, पिंपलगाँवकर, डोंगरकर, मुरुडकर, खेडेकर, धारवाडकर, लोणकर, खांडेकर, बेडेकर, किरलोसकर, करमरकर, खामकर, पावसकर, रायकर, देवळेकर, कलमकर, नगरकर, सालगांवकर, शिरडीकर, भुसावले, खांगांवकर, यवतमाले.
- **Killer Maharashtrians**
  वाघमारे, कुत्तरमारे, मानुसमारे, तितरमारे, पादमारे, हगमारे, मनमारे, भिडे, किरकिरे, फडके, दांडेकर.
- **Royal Maharashtrians**
  पाटील, सावंत, वावले, सूर्यवंशी, भोसले, मालुसरे, निंबाळकर, मराठे, खांडेकर
- **City Maharashtrians**
  वसईकर, पनवेलकर, चिपळूणकर, माहिमकर, कोल्हापुरे, नागपुरे, दादरकर, पुणेकर
- **Tasty Maharashtrians**
  कडू, गोडे, आंबटे

इस लिस्ट में कोई मजाक नहीं है । ये सभी सही महाराष्ट्रीयन सरनेम हैं । जिन्हे एक व्यवस्थित रिसर्च के बाद केटेगराइज किया गया है । Pl. enjoy w/o getting emotional... सारे प्रयासों के बावजूद भी कई दुर्लभ व दिलचस्प सरनेम शेष रह गए है, ऐसे सभी प्रकरणों मे सविनय क्षमा-याचना के साथ निवेदन है की आप शोधकर्ता का उदार सहयोग कर सकते हैं ।

संग्राहक - **अरुण सरपोतदार, पुणे**

* संस्थावृत्त *

# *** राणी लक्ष्मीबाई जयंती ***





रत्नागिरी : रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघामध्ये राणी लक्ष्मीबाईंना अभिवादन करताना संघाचे अध्यक्ष माधव हिर्लेकर व पदाधिकारी

## कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे राणी लक्ष्मीबाईंना अभिवादन

राणी लक्ष्मी यांच्या जयंतीनिमित्त रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे अभिवादन करण्यात आले. संघाच्या राणी लक्ष्मीबाई सभागृहात सकाळी राणी लक्ष्मीबाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे अध्यक्ष माधव हिर्लेकर, डॉ. श्रीकृष्ण जोशी, दिलीप ढवळे, चंद्रकांत हळबे, डॉ. शरद प्रभुदेसाई, मानस देसाई, ॲड. प्रिया लोवलेकर आणि शिल्पा पळसुलेदेसाई आदी पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. यंदा कोरोना लॉकडाऊनमुळे दरवर्षीप्रमाणे मोठ्या समारंभाचे आयोजन करण्यात आले नाही.




**पुणे संघाच्यावतीने** दि. १९ नोव्हेंबर रोजी कार्यकारी मंडळाच्या काही सदस्यांच्या उपस्थित झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेला संघाचे अध्यक्ष श्री. मकरंद फणसळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी अध्यक्ष श्री. फणसळकर, श्री. अमित शहाणे कार्यवाह, श्री. हेमंत हिर्लेकर उपाध्यक्ष, श्री. हेमंत पुराणिक, श्री. गणेश गुर्जर, सौ. मुक्ता चांदोरकर आणि सौ. वैशाली वर्णेकर उपस्थित होते.



**झाशीची राणी जयंती : सावंतवाडी**

कार्यक्रमास जिल्हा समिती अध्यक्ष श्री. प्रदीप जोशी, उपाध्यक्ष श्री. सतीश शेजवलकर, दोडामार्ग येथील समिती सदस्य श्री. गुरुदास मणेरीकर, श्री. गुरुप्रकाश साप्ते, सौ. नीलम जोशी, डॉ. रश्मी जोशी तसेच श्रीमती जोशी उपस्थित होत्या.

# तव स्मरण आम्हां सतत घडो



भक्ति-सेवा विद्यापीठ हायस्कूलचे संस्कृत विषयाचे माजी शिक्षक **गुरुवर्य वि. गो. देसाई गुरुजी** (वय वर्षे ८७) यांचे दिनांक २९ ऑक्टोबर २०२० रोजी पहाटे गोवा मुक्कामी दुःखद निधन झाले. भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक, संस्कृत विषयाचे पंडित आणि राज्यशासनाने संस्कृत पंडित म्हणून सत्कार केलेले ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व असा त्यांचा लौकिक होता. संस्कृतचे शिक्षण त्यांनी मठांमध्ये राहून माधुकरी मागून पूर्ण केले होते. कोल्हापूर भूषण, वेदशास्त्रसंपन्न पंडित कै. श्रीपाद शास्त्री जेरे यांचे ते शिष्य होते. कोणताही झगमगाट न करता ज्याप्रमाणे देवघरातील समयी सर्वांना शांतपणे प्रकाश देण्याचे काम करते तसेच वि. गो. देसाई गुरुजी आयुष्यभर ज्ञानप्रकाश देत राहिले. विद्यापीठ हायस्कूलमधील निवृत्तीनंतर गीता मंदिरच्या माध्यमातून त्यांनी आपले ज्ञानदानाचे कार्य अखंड सुरु ठेवले होते.

पूज्य देसाई सरांनी नववीत आम्हाला एक संस्कृत श्लोक शिकवला होता. आजही तो मला स्पष्ट आठवतो.

*तमाखूंपत्रं राजेंद्रम् भजमाज्ञान दायिकम् ।*
*तमाखूंपत्रं राजेंद्रम् भजमाज्ञान दायिकम् ।।*

या श्लोकातील दोन्ही ओळी सारख्याच आहेत, पण संधी विग्रह वेगळा आहे तो असा,

तमाखू पत्रं राजेंद्रम् भजम् अज्ञान दायिकम् ।
तम आखूपत्रं राजेंद्रम् भजमा ज्ञानदायिकम्...

खरोखरच देसाई सर ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होतं. ते कोणावरही रागावल्याचं स्मरणात नाही.
ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.



कऱ्हाडे ब्राह्मण संघ साताऱ्याचे संस्थापक सदस्य **श्री. अप्पासाहेब करंबेळकर** यांच्या निधनाचे वृत्त ऐकून फारच वाईट वाटले. सातारा येथे त्यांची भेट घेण्याचा योग आम्हाला आला होता. याही वयात त्यांची स्मरणशक्ती आणि उत्साह तरुणाला लाजवेल असाच होता. आज साऱ्या आठवणी जाग्या झाल्या. त्यांच्या जाण्याचे श्री. सुधीर आणि कुटुंबियांचे दुःख खूप मोठे आहे. आम्ही कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे सर्व कार्यकर्ते त्यांच्या दुःखात सहभागी आहोत. अप्पासाहेबांना चिरशांती लाभो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना !

# *** भावपूर्ण श्रद्धांजली ***



जयपूर अत्रौली घराण्याचे **ख्यातनाम गायक पं. दीनकर पणशीकर** यांचे हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झाले. ज्येष्ठ अभिनेते स्व. प्रभाकर पणशीकर व प्रसिद्ध व्याख्याते श्री. दाजी पणशीकर यांचे ते कनिष्ठ बंधू आणि गायक पं. भूपाल पणशीकर यांचे ते पिताश्री होत.

पं. सुरेशराव हळदणकर, पं. वसंतराव कुलकर्णी, पं. निवृत्तीबुवा सरनाईक अशा दिग्गजांकडे त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले. आपल्या बहारदार गायकीने अनेक मैफिली गाजवल्या. अशा या महान गायकास भावपूर्ण श्रद्धांजली.

गतात्म्यास सद्‌गती लाभो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना !

१) पुणे संघाच्या कार्यकारिणीचे सदस्य आणि पूर्वीच्या भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे कार्यवाह **गोपाळ भाटवडेकर** यांचे नुकतेच पुणे येथे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

२) कऱ्हाडे ब्राह्मण संघ
बडोदा कार्यकारिणी सदस्या **श्रीमती क्षमा पंडित** यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

*महासंघाच्यावतीने स्वर्गीय **श्री. गोपाळ भाटवडेकर** आणि **श्रीमती क्षमा पंडित** यांना भावपूर्ण श्रद्धांजली.*
*ईश्वर आत्म्यास सद्‌गती देवो.*

**सद्‌गुण..**

चांगुलपणा हा माणसाचा सद्‌गुण आहे. आपण तो जपण्याचा सातत्याने प्रयत्न केला पाहिजे. एकमेकांना सहकार्य करणे, मदत करणे, दुसऱ्यांबद्दल चांगली भावना ठेवणे हे नेहमीच आचरणात आणले तर जीवनाला एक नवीन आयाम प्राप्त होईल. दुसऱ्यांनी चांगले म्हणावे ही अपेक्षाच चुकीची आहे. स्वतःला स्वतःचे मूल्यमापन करता आले पाहिजे. आपण जे काही करतो आहे ते बरोबर आहे की चूक आहे, हे आपले अंतर्मन नेहमीच सांगते. त्यामुळे त्याला फसवता येत नाही. प्रत्येकालाच आपण आवडतो असे कधी होत नसते. त्यामुळे स्वतःशीच प्रामाणिक असणे गरजेचे असते. चांगल्या-वाईटांची व्याख्या ही व्यक्तिपरत्वे बदलत असते. ज्याला आपण फायद्याचे ठरतो तो आपणाला चांगला समजतो आणि ज्याला अडचणीचे ठरतो त्याच्यासाठी वाईट ठरतो. मग त्या ठिकाणी आपण बरोबर असलो तरीही ! सगळ्यांनाच खुश ठेवणे शक्य नसते म्हणून आपण स्वतः प्रामाणिक भूमिका ठेवायची, मग कुणी काहीही म्हणो... आपण आपलं चांगलं काम चालूच ठेवायचं... इतरांचं त्यांच्यापाशी. फक्त आपल्यातला 'चांगुलपणा' कमी होऊ द्यायचा नाही.

**आयुष्य...**

शांत पाण्यात स्पष्ट प्रतिमा पहात असतांना, कुणी पाणी ढवळून वलय निर्माण केलं, तर गोंधळून जाऊ नका. पाणी पुन्हा शांत होण्याची वाट पहा, प्रतिमा पुन्हा स्पष्टच दिसेल, दैनंदिन कामातही असे अडथळे येतच असतात. म्हणून खचून जायचं नसतं, थोड्या वेळाने त्याच कामात रमायचं असतं. कुणीतरी पुढे गेला, म्हणून द्वेष करत बसण्यापेक्षा, आपण मागे का राहिलो, हा विचार करा आणि चालत राहा. स्पर्धा स्वतःशी करा, जगाशी नाही. आयुष्य खूप सुंदर आहे, धनदौलत कोण कोणाला देत नाही, फक्त माणुसकी जपत राहा. प्रसंग कोणताही असो, सुखाचा की दुःखाचा, त्यासाठी कोणी हाक दिली, तर प्रेमाने साथ द्या... !

## माणुसकी

मेलेल्या माणसाला खांदा देण्याचे काम कितीही पवित्र आणि परोपकारी असले तरी जो मेलेला आहे त्याला त्याचा काहीच उपयोग नसतो.., पण किती मेलेल्या माणसांना खांदा दिला, यापेक्षा किती 'जिवंत' माणसांना हात दिला यावर आपली माणुसकी ठरत असते.

माणूस मेलेला कळताच धावून जाणारी माणसे, तो जिवंत असताना, अडचणीत असतानाच का बरं धावून जात नाहीत... ?

खरे तर माणूस मेल्यानंतर धावणाऱ्या माणसांची धावपळ व्यर्थ असते, कारण तुम्ही नाही गेला तरी माणसे त्याला जाळल्याशिवाय राहणार नाहीत... पण ही व्यर्थ धावपळ करणारेच खूप आहेत. खरंतर आजकालच्या या खोट्या दिखाव्याच्या शर्यतीत, तू मोठा की, मी मोठा ? क्षणभंगुर श्रीमंत दाखविण्यापायी, माणूस माणसाला, आपल्या नात्याला विसरत चाललाय, म्हणूनच बोलतोय जिवंतपणी, जिवंत माणसासाठी, जिवंत असणाऱ्या व अडचणीत सापडलेल्या, एकाला तरी आयुष्यात खरा प्रामाणिक हात द्या.

झालं गेलं विसरून, तुझं माझं सोडून माणूस व्हा !
मरेपर्यंत त्याचा अभिमान वाटेल...



Regd. Periodical RNI - No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)

WE LOVE
WHAT WE DO.

VJ | VILAS JAVDEKAR DEVELOPERS

www.javdekars.com

Corporate Office : 306, Siddharth Towers, Sangam Press Road,
Kothrud, Pune 411038. T : +91-20-67648000

Book Post ( Regd. Periodical)

प्रेषक :
संपादक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे ‘संपर्क’
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
‘अनिश प्रासाद’ अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४३ २४४३

To,